cmyk

## संपादकीय

### बंडखोरीच्या उद्रेकाने मुख्य उमेदवारांना घाम...

अनेक ठिकाणी बंडोबांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने निवडणुकीत रंगत वाढली आहे. बंडोबांना आमदारकीचा गुलाल लागतो की, मतविभाजनामुळे तिसऱ्याच कुणा उमेदवाराला लॉटरी लागते याची उत्सुकता आता आहे. राज्यात बंडखोरीचा सार्वत्रिक उद्रेक झाला आहे. त्यामुळे कित्येक उमेदवारांना घाम फुटला आहे. त्यातून अनेकांची पराभवाची धाकधूक वाढली आहे. प्रमुख पक्षाच्या उमेदवारांविरोधात अनेक ठिकाणी बंडखोरांनी आपले अर्ज कायम ठेवत निवडणुकीत आव्हान कायम ठेवले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### पक्ष आणि घड्याळ चिन्हाबाबत १३ नोव्हेंबरला सुनावणी

मुंबई-वर्तमानपत्रात मराठी भाषेत घड्याळ चिन्हाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा मजकूर ३६ तासांत प्रसिद्ध करा आणि प्रतिज्ञापत्र सादर करा, असे आदेश सुप्रीम कोर्टाने राष्ट्रवादीला दिले. तर पुढील सुनावणी ही १३ नोव्हेंबर रोजी होणार आहे. बुधवारी झालेल्या सुनावणीमध्ये कोर्टाकडून डिस्क्लेमरबाबत विचारणा करण्यात आली. त्यावर आपल्याकडून जाहिरातीच्या प्रत्येक ठिकाणी पक्ष आणि चिन्हाबाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे असा डिस्क्लेमर दिला जात असल्याचे राष्ट्रवादी पक्षाच्या वकिलांनी उत्तर दिले. यावर प्रत्येक दिवशी येणाऱ्या जाहिरातीमध्ये हा डिस्क्लेमर देत आहात का असा सवाल कोर्टानं केला. तेव्हा दररोजच्या नाही मात्र कॉमन ठिकाणी डिस्क्लेमर दिला असल्याचे उत्तर वकिलांनी दिले. तर अनेक ठिकाणी डिस्क्लेमर दिला नसल्याचा दावा, राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या वकिलांनी केला.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–१९४ | गुरूवार, दि.७ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ४ | किंमत ३ रूपये

# पांढऱ्या सोन्याला भाव मिळेना; नेते मात्र निवडणुकीत व्यस्त

## शेतकरी हवालदिल, कवडीमोल किमत मिळत असल्याने खर्चही निघेना



**बीड । प्रतिनिधी**

**यंदाचा खरीप हंगाम पूर्णत: वाया गेला आहे. मूग, उडीद, मका पिकांचे चांगले उत्पादन आले नसल्याने शेतकरी संकटात सापडला आहे. शिवाय कापसाचे देखील उत्पादन कमीच असण्याची शक्यता आहे. शिवाय आता शेतकरी काढलेला कापूस विक्रीसाठी नेत असून त्याला देखील चांगला भाव मिळत नसल्याने खर्च देखील निघेल कि नाही याबाबत शेतकऱ्यांमध्ये चिंता आहे. तर दुसरीकडे नेते मंडळी मात्र निवडणूकीत व्यस्त आहेत.**

बीडसह मराठवाड्यात काही ठिकाणी बाजार समितीत कापूस खरेदी होत आहे. मात्र बाजार समितीचा कापूस खरेदी केंद्रांना शेतकऱ्यांच्या प्रतिसाद मिळत नसल्याचे चित्र आहे. स्थानिक व्यापारी हे ४०० ते ५०० रुपये कमी दराने कापसाची खरेदी

◀◀ पान २ वर

### शेतकऱ्यांपुढे संकट

बळीराजासमोर एकामागून एक संकट उभेच असते. मुळात यंदा सततच्या पावसाने खरीप हंगामाला मोठ्या प्रमाणात फटका बसला आहे. अर्थात सततच्या पावसामुळे पिकांचे नुकसान झाले असून अपेक्षित असे उत्पन्न मिळाले नाही. तर कापसावर शेतकऱ्यांच्या आशा होत्या. मात्र जास्तीच्या पावसामुळे कापसाला देखील फुल धारणा कमी झाल्याने उत्पादनात घट झाली आहे. यात आता जे उत्पन्न आले त्याला देखील चांगला भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे आहे.

### उमेदवाराने माझ्या नावाचा व फोटोचा गैरवापर करू नये -जयदत्त क्षीरसागर

#### कार्यकर्त्यांशी चर्चा करून पुढील भूमिका ठरवणार



**बीड। प्रतिनिधी**

कोणालाही न सांगता ऐन वेळेला निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला. विधानसभा निवडणुकीत कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच पुढील भूमिका ठरवण्यात येईल असे सोशल मीडियाच्या एका पोस्टद्वारे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जाहीर केले आहे. तसेच कुठल्याही उमेदवाराने माझ्या नावाचा आणि फोटोचा गैरवापर करू नये असे देखील त्यांनी यामध्ये म्हटले आहे. त्यामुळे जयदत्त क्षीरसागर नेमका निर्णय काय घेतात याकडे संपूर्ण मतदारसंघाचे लक्ष

◀◀ पान २ वर

### योगेश क्षीरसागर यांनाच पाठिंबा देतील?

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर ते नेमका पाठिंबा कोणत्या उमेदवाराला देतील याविषयी सध्या जोरदार चर्चा आहे. मात्र कार्यकर्त्यांशी चर्चा करून ते महायुतीचे उमेदवार योगेश क्षीरसागर यांनाच पाठिंबा देतील अशी जोरदार चर्चा आहे.

#### लाडकी बहीण योजनेत २१०० रुपयांची वाढ; शेतकरी कर्जमाफी, अडीच लाख तरुणांना नोकऱ्या, यांसह अनेक महत्वपूर्ण घोषणा

# राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिध्द; ११ नवीन आश्वासने

## राष्ट्रवादी काँग्रेसकडून मतदारसंघनिहाय निवडणूक जाहीरनामा प्रसिद्ध; जाहीरनाम्यात ११ नवीन आश्वासने समाविष्ट; अजित पवारांनी बारामतीतून, प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी मुंबईतून तर धनंजय मुंडे यांनी परळीतून केला जाहीर...

**मुंबई । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी महाराष्ट्रातील लढवत असलेल्या विधानसभा मतदारसंघनिहाय निवडणूक जाहीरनामा (महाराष्ट्र घोषणापत्र) आज प्रसिद्ध केला असून या जाहीरनाम्यामध्ये अकरा नवीन आश्वासने समाविष्ट करण्यात आली आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस लढवत असलेल्या सर्व मतदारसंघात एकाचवेळी हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. बारामतीतून अजितदादा पवार, गोंदियामधून राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल पटेल, नाशिकमधून ज्येष्ठ नेते मंत्री छगन भुजबळ, पक्षाचे प्रवक्ते तथा कृषिमंत्री धनंजय मुंडे परळीतून हे



दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी होते. या जाहीरनाम्यामध्ये लाडकी बहीण योजनेची रक्कम २१०० रुपयांपर्यंत वाढवण्याचे जाहीर केले आहे. तर शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी करण्यात येणार आहे. शिवाय अडीच लाख नोकऱ्या आणि ग्रामीण भागात ४५ हजार पाणंद रस्त्यांचे बांधकाम करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

### परळीला दादांचा वादा

दरम्यान परळी मतदारसंघात धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून पुढील काळात ५ प्रमुख कामे करण्याचा वादाच अजितदादांनी दिला आहे. यात प्रामुख्याने वैद्यनाथ तीर्थक्षेत्राचा उज्जैन महाकाल मंदिराच्या धर्तीवर सर्वांगीण विकास करणे, सिरसाळा येथे २२०० एकर जागेत पंचतारांकित एमआयडीसी कार्यान्वित करून उद्योगांना चालना देऊन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे, दूध संकलन केंद्र उभारणे, औष्णिक विद्युत निर्मिती केंद्रात संच क्रमांक ९ ची उभारणी करणे व जुन्या औष्णिक विद्युत केंद्रात सौर ऊर्जा प्रकल्प उभारणे, जायकवाडीचे अडीच टीएमसी पाणी वाण धरणात तर एक टीएमसी पाणी तारुगव्हान येथे आणणे आणि परळी – बीड – नगर रेल्वे मार्ग जलद गतीने पूर्ण करून परळी वरून मोठ्या शहरांशी थेट कनेक्टिव्हिटी सुरू करणे ही ५ प्रमुख वचने अजित पवार यांनी जाहीर केले आहेत. तर धनंजय मुंडे हे अंबाजोगाई तालुक्यातील मुडेगाव येथील कॉर्नर बैठकीतून या जाहीरनामा प्रकाशन कार्यक्रमास ऑनलाइन पद्धतीने उपस्थित होते.

अजित पवार यांनी बारामती मतदारसंघातून बारामतीसाठी आणि पक्षाचा राज्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. राष्ट्रवादी

◀◀ पान २ वर

### पीएम विद्यालक्ष्मी योजनेस मंजुरी

नवी दिल्ली : नवी दिल्लीत बुधवारी झालेल्या मोदी मंत्रिमंडळाच्या बैठकीत पीएम विद्यालक्ष्मी योजनेला मंजुरी देण्यात आली. यामध्ये भारत सरकार उच्च शिक्षणासाठी ७.५ लाख रुपयांपर्यंतच्या कर्जावर ७५ टक्के क्रेडिट गॅरंटी देण्यात येणार आहे.

# विकासाचे टाईमिंग साधण्यासाठी घड्याळाला मतदान करा-विजयसिंह पंडित

## 'जाहिरनामा गेवराईचा घोषणापत्र' चा प्रकाशन समारंभ

**गेवराई । प्रतिनिधी**

सामान्य माणसाचा विकास हाच केंद्रबिंदू घेवून विकासाच्या मुद्यावर विधानसभा निवडणुक लढवत आहोत. गेवराई शहर व ग्रामीण भागातील लोकांच्या समस्या आपल्याला सोडवायच्या आहेत, विकासाचा रथ गतीने पुढे घेवून जायचा आहे, विकासाचे टाईमिंग साधण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला घड्याळ




चिन्हासमोरील बटन दाबून मला काम करण्याची संधी द्या असे आवाहन महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांनी केले. 'जाहिरनामा गेवराईचे घोषणापत्र' चे प्रकाशन प्रसंगी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

◀◀ पान २ वर

### अमेरिकेत पुन्हा ट्रम्प सरकार

न्युयार्क : अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीच चित्र स्पष्ट झाले आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी बाजी मारली आहे. ते चांगल्या मताधिक्क्याने विजयी झाले आहेत. कमला हॅरिस पराभूत झाल्या आहेत. त्यामुळे अमेरिकेत पुन्हा एकदा ट्रम्प सरकार येणार आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय ही बांग्लादेश, चिनसह इराणसाठी धोक्याची घंटा आहे. त्याची त्यांना प्रचिती यायला सुरुवात झाली आहे. इराणची करन्सी आतापर्यंतच्या

◀◀ पान २ वर

# अजित दादाच्या नेतृत्वाखाली बीड मतदार संघाचा विकास होईल

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या जाहिरनामा प्रकाशन सोहळ्यात डॉ.योगेश क्षीरसागर यांचा विश्वास

**बीड । प्रतिनिधी**

**गेली अनेक वर्ष माझे वडील डॉ.भारतभूषण क्षीरसागर यांनी बीडच्या नगराध्यक्षपदी काम केलेले आहे. त्यामुळे त्यांचा आणि माझाही जनसंपर्क हा बीड शहरात होता. पण आता आम्हाला ग्रामीण भागातूनही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील जनताही आमच्यासोबत आहे.**




ना.अजितदादा यांच्या नेतृत्वाखाली बीड मतदारसंघाचा विकास होईल, असा विश्वास राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष

◀◀ पान २ वर

## सुचना

तांत्रिक कारणामुळे दि.७ नोव्हेंबर रोजी दैनिक राज्य लोकतंत्रचा अंक सहा ऐवजी चार पानी अंक असणार आहे.यांची सर्व वाचक, एंजन्ट, जाहिरातदार यांनी नोंद घ्यावी.

–व्यवस्थापक

# माझी निवडणूक जनतेने हातात घेतली

## भीमराव धोंडे यांची प्रचार सुभारंभ प्रसंगी मतदरांना भावनिक साद



**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदार संघातील सर्व मतदार व माझे कार्यकर्ते हेच स्वतःला भीमराव धोंडे समजुन तुम्हीच आमदारकीचे उमेदवार आहेत असे समजून प्रत्येकाने आपआपल्या

◀◀ पान २ वर

# बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी- जगताप

**बीड । प्रतिनिधी**

निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदरच राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाचे उमेदवार तथा विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांना बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या शेकडो कार्यकर्त्यांनी सोडचिट्टी देत बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप

◀◀ पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.६ नोव्हेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू: ७.५० क्विंटल** | | |
| २,७११ | २,७११ | २,७११ |
| **ज्वारी/हायब्रिड: ४९.०० क्विंटल** | | |
| २,००१ | २,७०० | २,३०१ |
| **मका/लोकल: ७.०० क्विंटल** | | |
| २,१५० | २,१५० | २,१५० |
| **तूर :७.५० क्विंटल** | | |
| ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| **उडीद :४.५० क्विंटल** | | |
| ६,५५१ | ६,८५१ | ६,७०१ |
| **बाजरी: ४६.५० क्विंटल** | | |
| २,१०० | ३,०८० | २,७२६ |
| **मुग : १२.०० क्विंटल** | | |
| ६,७०० | ७,७०० | ७,०७५ |
| **सोयाबीन: ५२३.५० क्विंटल** | | |
| २,९०१ | ४,३०० | ४,०१५ |
| **हरभरा: १.५० क्विंटल** | | |
| ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

# मी आमदार झालो तर सर्व पोरांचे लग्न करुन देणार

## परळी मतदार संघातील मविआचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांचे अजब आश्वासन



**परळी। प्रतिनिधी**

**जर मी आमदार झालो तर सर्व पोरांची लग्न करुन देऊ, असे अजब आश्वासन शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी दिले आहे. त्यांच्या या आश्वासनाची सर्वत्र चर्चा रंगली आहे.**

सध्या महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकांचा जोरदार प्रचार सुरु आहे. मतदारांना आकर्षित करण्यासाठी उमेदवारांकडून विविध आश्वासनं दिली जात आहेत. त्यातच आता राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटातील एका उमेदवाराने दिलेल्या आश्वासनाने सर्वांचेच लक्ष वेधून घेतले आहे. जर मी आमदार झालो तर सर्व पोरांची लग्न करुन देऊ, असे आश्वासन शरद पवार गटाचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी दिले आहे. त्यांच्या या आश्वासनाची सर्वत्र चर्चा रंगली आहे.

महाराष्ट्रातील हायव्होलटेज मतदारसंघांपैकी एक मतदारसंघ म्हणून परळी विधानसभा मतदारसंघाला ओळखले जाते. बीड जिल्ह्यातील

◀◀ पान २ वर

### राजसाहेब देशमुख नेमकं काय म्हणाले?

परळीतील तरुण पोरांना लग्नासाठी विचारताना लोक विचारतात, पोराला नोकरी आहे का? सरकारच देत नाही तर कशी लागणार, काही उद्योगधंदा आहे का? यामुळे सर्व पोरांचे लग्न होणे अवघड झाले आहे. त्यामुळे सर्व पोरांना मी आश्वासन देतो, जर मी आमदार झालो तर सगळ्या पोरांची लग्न लावून देऊ, सगळ्या पोरांना कामधंदा देऊ, असे अजब आश्वासन राजसाहेब देशमुख यांनी दिले.






cmyk

## अग्रलेख

# बंडखोरीच्या उद्रेकाने मुख्य उमेदवारांना घाम...

अनेक ठिकाणी बंडोबांनी आपला उमेदवारी अर्ज कायम ठेवल्याने निवडणुकीत रंगत वाढली आहे. बंडोबांना आमदारकीचा गुलाल लागतो की, मतविभाजनामुळे तिसऱ्याच कुणा उमेदवाराला लॉटरी लागते याची उत्सुकता आता आहे. राज्यात बंडखोरीचा सार्वत्रिक उद्रेक झाला आहे. त्यामुळे कित्येक उमेदवारांना घाम फुटला आहे. त्यातून अनेकांची पराभवाची धाकधूक वाढली आहे. प्रमुख पक्षाच्या उमेदवारांविरोधात अनेक ठिकाणी बंडखोरांनी आपले अर्ज कायम ठेवत निवडणुकीत आव्हान कायम ठेवले आहे. काही ठिकाणी भाजपा विरोधात अजित पवार गटात सामना होणार आहे, तर काही ठिकाणी मविआच्या शरद पवार गटातही लढत कायम आहे. त्यामुळे येथील निवडणूक चुरशीची होणार आहे. कोकणातही बंडखोरी कायम आहे. त्यामुळे अनेक चुरशीच्या लढती पाहायला मिळणार आहेत.

मनोज जरांगे-पाटील यांनी माघार घेतली आणि त्यामुळे भाजपाला त्याचा तोटा होणार की फायदा याचीही गणिते आतापासूनच आखली जाऊ लागली आहेत. विशेष म्हणजे मराठवाड्यात भाजपाला म्हणजे महायुतीला विजयी होण्यासाठी दहा टक्के मते वाढवावी लागतील, अशी स्थिती आहे, तर तिकडे कोल्हापुरात पूर्वाश्रमीच्या मधुरिमाराजे छत्रपती यांनी निवडणूक रिंगणातून माघार घेतली आहे. काँग्रेसला हा मोठा धक्का मानला जातो. मधुरिमाराजे या काँग्रेस नेते छत्रपती राजे यांच्या सून असून त्यांनी नुकतीच लोकसभा निवडणुकीत शिवसेना उमेदवाराचा पराभव करून निवडणूक जिंकली होती. काँग्रेसला हा धक्का आहे आणि असे अनेक धक्के बंडखोरांनी दिले आहेत. महाविकास आघाडी आणि महायुती या दोन्ही पक्षांना किंवा आघाड्यांना बंडखोरीने ग्रासले आहे. सदा सरवणकर यांनी माघार घेतलेली नाही. त्यामुळे त्यांचे नाव उमेदवार यादीत कायम आहे. त्यामुळे निवडणूक रंगतदार होणार असली तरीही उमेदवारांची धाकधूक वाढली आहे. काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी मधुरिमाराजे यांना पाठिंबा दिला होता आणि त्यांनी मधुरिमाराजे यांच्या माघारीनंतर वैताग व्यक्त केला. अन्यत्रही हीच स्थिती आहे आणि जेथे उमेदवार प्रबळ आहेत तेथे त्यांना बंडखोरांचे तगडे आव्हान आहे. महाराष्ट्रात सर्वत्र हीच परिस्थिती आहे.

काँग्रेसला आता अपक्ष लाटकर यांना पाठिंबा देण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. संपूर्ण महाराष्ट्रात सर्वत्र बंडखोरीची लागण झाली आहे आणि त्यातून कुणीही सुटलेले नाही. कालपर्यंत बंडखोरांची समजूत घालण्यात व्यस्त असलेले अनेक पक्षांचे ज्येष्ठ नेते शेवटपर्यंत वाटाघाटीत निमग्न होते. पण उपयोग काहीही झाला नाही. भाजपासाठी मात्र काहीसा दिलासा आहे. कारण त्यांचे उमेदवार गोपाळ शेट्टी यांनी उमेदवारी अर्ज मागे घेऊन भाजपाच्या उमेदवाराची विजयाची वाट मोकळी करून दिली आहे. त्यामुळे भाजपाला बंडोबांना थंड करण्यात यश आले आहे. त्यामुळे भाजपा नेत्यांना झालेला आनंद दिसून येणारा होता. गोपाळ शेट्टी यांची जागा अत्यंत सुरक्षित म्हणून ओळखली जाते. आता तेथे त्यांचे आव्हान नसल्याने भाजपाच्या उमेदवाराचा विजय सोपा असेल. भाजपाचे गोपाल शेट्टी, स्वीकृती शर्मा, विश्वजीत गायकवाड, दिलीप कुमार आर्दीनी आपापल्या बंडाच्या तलवारी म्यान केल्या आहेत. महाविकास आघाडीच्या वतीने लक्ष्मीचे माघार ही मुख्तार शेख यांची आहे. तसेच मधू चव्हाण यांनी आपला उमेदवारी अर्ज मागे घेऊन भाजपाचा विजय सोपा केला आहे, तर पेण, पनवेल आणि अलिबाग येथे शेतकरी कामगार पक्षाच्या उमेदवार चित्रलेखा पाटील यांना पाठिंबा देण्यास स्वतः उद्धव ठाकरे यांनी सांगितले आणि नंतरच या उमेदवारांनी माघार घेतली आहे. ठाकरे, शरद पवार आणि नाना पटोले यांनी बंडखोरांविरोधात कठोर कारवाई करण्याचा इशारा दिल्यानंतर बंडखोरांनी तलवारी म्यान केल्या. पण काही ठिकाणी नेत्यांनी लक्ष घातले नाही. त्यामुळे बंडखोराचे आव्हान कायम आहे. मनोज जरांगे-पाटील यांची भूमिका ही स्वागतार्ह असली आणि ती भाजपासाठी अडचणीची ठरणारी असली तरीही शरद पवार म्हणतात तसे होईल असे नाही. कारण केवळ एका जातीच्या आधारे निवडणूक जिंकून येणे अशक्य आहे हे मनोज जरांगे यांना कळले आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही बंडखोर उमेदवारांना माघार घेण्याचे आवाहन केले होते आणि त्यानुसार त्यांनी आपली उमेदवारी मागे घेतली.

अनेक ठिकाणी अशा तुरळक लढती असल्या तरीही मोठ्या ठिकाणी तरी सहसा नेहमीच्या लढती कायम असतील. निकालात फारसे आश्चर्यकारक बदल नसतील. भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि अजित पवार गट आणि महाविकास आघाडी यांच्यातच सरळ लढती होतील अशी शक्यता दिसते. आता सारे लक्ष लढतींकडे लागले आहे आणि प्रत्यक्ष मतदानाची आकडेवारी कोणा किती देतो आणि प्रत्यक्षात कोणत्या गटाचे कार्यकर्ते किती लोकांना मतदान केंद्रांपर्यंत आणतात यावर मतदानाची आकडेवारी अवलंबून आहे. इथून पुढे कार्यकर्त्यांची धाकधूक असेल ती मतदानापर्यंत ते कसे आणले जातात त्यावर आणि त्यांची कामगिरी काय असते यावर. त्यामुळे काही दिवस फक्त निकालाची वाट पाहणे यातच सारे लक्ष असेल. हरियाणा निवडणुकीचा परिणाम महाराष्ट्राच्या निवडणुकीवर होईल काय असा प्रश्न आहे. भाजपाने तेथे जोरदार मुसंडी मारली आणि अखेरच्या क्षणी निवडणूक जिंकली होती. तीच पुनरावृत्ती पुन्हा भाजपा महाराष्ट्रात करण्याच्या तयारीत आहे. लाडका बहिणी भाजपच्या मदतीला आहेत आणि त्या योजनेच्या यशावर भाजपाचे यश निश्चित आहे असे मानले जाते. पण खरे काय ते निकाल लागल्यावरच समजेल. बंडखोरी सर्वत्र झाली असली तरीही काही ठिकाणी ती शमली आहे. शरद पवार गटाने बंडखोरांना इशारा दिल्यावर काही ठिकाणी बंडखोरी शमली, तर काही ठिकाणी बंडखोरांनी आपण होऊनच माघार घेतली. त्यामुळे यंदाची निवडणूक चुरशीची होणार आहे आणि त्यात कमालीची रंगत असेल हे नक्की. सदा सरवणकर यांच्या उमेदवारीमुळे अमित ठाकरे यांचा मार्ग खडतर झाला आहे.

# कैलास गोरंट्याल यांना मंत्री पदाची संधी मिळणार-अन्न नागरी पुरवठा मंत्री रेड्डी

जालना । प्रतिनिधी

**राज्यात महाविकास आघाडीसाठी अत्यंत पोषक वातावरण निर्माण झाले आहे. मतदारांची देखील राज्यात परिवर्तन करण्याची मानसिकता असल्यामुळे महाविकास आघाडीला राज्यात किमान दोनशे जागा मिळतील असा विश्वास व्यक्त करून जालना विधानसभा मतदार संघातून महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांना आघाडीच्या सरकारमध्ये मंत्री पदाची संधी मिळेल अशी ग्वाही तेलंगणा राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा काँग्रेस पक्षाचे मराठवाडा निरीक्षक उत्तमकुमार रेड्डी यांनी यावेळी बोलतांना दिली.**



जालना विधानसभा मतदार संघातील इंडिया महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंट्याल यांच्या शहरातील मामा चौकातील मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उदघाटन रेड्डी यांच्या हस्ते आज बुधवारी सांयकाळी करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा.डॉ.कल्याण काळे हे होते तर शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर,जगदिश्वर राव, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, रा.कॉ.चे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख, जेष्ठ नेते एकबाल पाशा, राजेंद्र राख, शेख युसुफ, अखबर खान, रिपाईचे किशोर मघाडे, आपचे संजोग हिवाळे, बदर चाऊस, विनय कोठारी, नंदाताई पवार, अब्दुल रऊफ परसुवाले, प्रभाकर पवार, गणेश राऊत, नंदकिशोर जांगडे, विजय चौधरी, दिनकर घेवंदे, अब्दुल रफिक आदिंची यावेळी उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना रेड्डी म्हणाले की, कॉंग्रेस पक्षाने आपल्यावर मराठवाडा विभागाची जबाबदारी सोपवली आहे. मागील काही दिवसात निवडणुकीच्या निमित्ताने विविध ठिकाणी जाण्याचा योग आला असून सामान्य जनता ही महाविकास आघाडीच्या बाजुने असल्याचे दिसून आले. राज्यात महाविकास आघाडीची सत्ता निश्चितपणे येणार असून सत्ता आल्यास मविआचे उमेदवार कैलास गोरंट्याल यांच्यावर मोठी जबाबदारी सोपविण्यात येईल अशी ग्वाही देत राज्यात उध्दव ठाकरे, शरद पवार आणि कॉंग्रेस समन्वयाने काम करत असल्यामुळे मतदारांपर्यंत आघाडीच्या संदर्भात चांगला संदेश पोहचला आहे. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात मविआने जोरदार मुसंडी मारत जे यश मिळवले आहे तीच परिस्थीती विधानसभा निवडणुकीत राहील असे सांगुन किमान दोनशे जागांवर महाविकास आघाडीला यश मिळेल असे ते म्हणाले. तेलंगणा राज्यात कॉंग्रेस पक्षाचे सरकार आल्यानंतर शेतकऱ्यांना सुमारे १८ हजार कोटी रूपयांची कर्ज माफी देण्यात आली असून आणखी १० हजार कोटी रूपयांची तरतुद करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगीतले. घरगुती गॅस सिंलेडर केवळ ५०० रूपयांत देण्याचा वायदा देखील पुर्ण केला असून तरूणांच्या हाताला काम देण्यासाठी देखील सरकारने पुढाकार घेतला आहे. महाराष्ट्र राज्यात शेतकरी, बेरोजगार, दिन-दलीत, कष्टकरी, कामगारांना न्याय देण्यासाठी महाविकास आघाडी सरकार सत्तेवर येणे गरजेचे आहे. सर्व घटकांनी येणाऱ्या निवडणुकीत जागरूकपणे मतदान करून कैलास गोरंट्याल यांना विजयी करण्याचे आवाहन रेड्डी यांनी यावेळी केले.

### ग्रामिण भागातही उत्स्फुर्त प्रतिसाद-आ.गोरंट्याल

जालना शहर हे धर्मनिरपेक्ष विचाराचे शहर असल्यामुळे प्रत्येक निवडणुकीत आपल्याला शहरात मोठे मताधिक्य मिळाले असले तरी ग्रामिण भागात आपण नेहमीच पिछाडीवर राहिलेलो आहे. मात्र यावेळी उध्दव ठाकरे यांची शिवसेना सोबत असल्यामुळे ग्रामिण भागात देखील आपल्याला उत्स्फुर्त असा प्रतिसाद मिळत असल्याचा दावा मविआचे जालना विधासभा मतदार संघातील उमेदवार कैलास गोरंट्याल यांनी केला आहे. शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सोबत असल्यामुळे शहरी भागाप्रमाणेच ग्रामिण भागातुन देखील आपल्याला मोठे मताधिक्य मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करून लोकसभा निवडणुकीत जसे यश मविआला मिळाले तशीच परिस्थिती विधानसभा निवडणुकीत देखील दिसून येत आहे. उध्दव ठाकरेंची शिवसेना आणि शरद पवारांची राष्ट्रवादी कॉंग्रेस फोडण्याचा पाप करणाऱ्यांना लोकसभेत मतदारांनी धडा शिकवला आहे. महाराष्ट्र राज्य हे वारकरी संप्रदायाच्या विचाराने चालणारे राज्य असून मतपेटीतुन मतदार राजा हा आपला राग व्यक्त करतात असेही शेवटी गोरंट्याल म्हणाले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन राम सावंत यांनी तर शेवटी आभार बाला परदेशी यांनी मानले.

### पदाधिकारी, कार्यकर्त्यांना न्याय मिळेल-देशमुख

जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार कैलास गोरंट्याल हे या निवडणुकीत मराठवाडा विभागातुन ऐतिहासिक मताधिक्यांनी विजयी होतील असा ठाम विश्वास कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांनी व्यक्त केला. राज्यात मविआची सत्ता येणार असून यावेळी जालन्यातील मंत्री पदाची भुक गोरंट्याल यांच्या रूपाने निश्चितपणे दुर होईल असे सांगुन लोकसभेप्रमाणेच मविआच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांना परिश्रम घ्यावेत. भविष्यात सत्ता आली तर सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना निश्चीतपणे न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही देशमुख यांनी यावेळी दिली.

# विजयसिंह पंडित यांच्या प्रचारातील आघाडीमुळे आजी-माजी आमदारांची धाकधुक वाढली

गेवराई । प्रतिनिधी

**गेवराई विधानसभा मतदार संघात गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत विजयसिंह पंडित यांना निसटत्या पराभवाला सामोरे जावे लागले होते. यावेळी मात्र संपुर्ण ताकदीनिशी त्यांची प्रचार यंत्रणा सुरुवातीपासूनच कामाला लागलेली आहे. प्रचाराच्या पहिल्याच टप्प्यामध्ये विजयसिंह पंडित यांनी घेतलेल्या आघाडीमुळे आजी-माजी आमदारांची धाकधुक वाढली असून विजयसिंह पंडित या निवडणुकीत बाजी मारतील अशी चर्चा मतदार संघात सुरु झाली आहे. दरम्यान सहानुभूती मिळविण्यासाठी विरोधातील दोन्ही आजी-माजी आमदार मतदारांच्या दारोदारी फिरत असून त्यांना मिळत असलेल्या अल्प प्रतिसादामुळे त्यांचा पराभव अटळ आहे अशी शक्यता जाणकारांनी व्यक्त केली आहे.**

गेवराई विधानसभा मतदार संघात विजयसिंह पंडित यांनी प्रचाराच्या पहिल्याच टप्प्यात जोरदार मुसंडी मारली असल्यामुळे विरोधकांनी त्याची धास्ती घेतली आहे. आपलाच विजय होणार या अविर्भावात वावरणाऱ्या आजी-माजी आमदारांना यंदाची निवडणुक जड जाताना दिसत आहे. विजयसिंह पंडित यांच्या रुपाने आपल्या हक्काचा लोकप्रतिनिधी विधानसभेत पाठविण्यासाठी मतदारांनीच निर्णय घेतला असून विजयसिंह पंडित यांना मतदारांकडून मिळणाऱ्या उत्स्फुर्त प्रतिसादामुळे विरोधकांनी त्यांच्या प्रचाराचा धसका घेतला आहे. शिवसेना (शिंदे गट), भाजपा आणि केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचा रिपाई पक्ष



तसेच इतर महापक्षाच्या महायुतीची वज्रमुठ आवळली गेल्याने तसेच पुर्वानुभव असलेले माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या मुरब्बी राजकीय खेळीमुळे महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित यांची विजयाकडे घोडदोड चालू आहे. विरोधकाकडे कसलाच मुद्दा शिल्लक नसल्याने ते गावा-गावात तोंडघशी पडताना दिसत असून विजयसिंह पंडितांच्या विकासाच्या मुद्यावरील प्रचारामुळे मतदार संघात प्रचंड अनुकूल वातावरण झालेले आहे. दरम्यान माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्व आणि मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, विविध संस्थाचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी विजयसिंह पंडित यांच्या विजयासाठी कंबर कसली आहे. येणाऱ्या २० तारखेला विजयसिंह पंडित यांच्या घड्याळ या चिन्हासमोरील बटन दाबून त्यांना विक्रमी मतांनी विजयी करून इतिहास रचा असे आवाहन अमरसिंह पंडित यांनी कार्यकर्त्यांना आणि मतदारांना केले आहे. विजयसिंह पंडित यांना मिळणाऱ्या वाढत्या प्रतिसादामुळे विजय त्यांच्या दृष्टीक्षेपात असल्याची चर्चा सर्वत्र होताना दिसते आहे.

# पान १ वरून...

## पांढऱ्या सोन्याला भाव मिळेना;

करत होत असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. बीडसह मराठवाड्यात यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाले असल्याने पिकांना मोठा फटका बसला होता त्यामुळे उत्पादनात घट आली आहे. तर एकीकडे शेतकऱ्यांच्या कापसाला भाव मिळत नसतांना दुसरीकडे मात्र नेते मंडळी निवडणुकीमध्ये व्यस्त आहेत.

----------

## राष्ट्रवादी काँग्रेसचा जाहीरनामा

काँग्रेसने पहिल्यांदाच लढवत असलेल्या मतदारसंघनिहाय पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यावेळी राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी सरकार स्थापनेनंतर १०० दिवसात नवीन महाराष्ट्राचे व्हिजन जाहीर करु असे बारामतीतून माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. तर परळीतून धनंजय मुंडे यांनी पक्षाचा जाहीरनामा प्रकाशित करत दादांनी परळीला दिलेली ५ वचने प्रसिद्ध करण्यात आली. याशिवाय प्रशिक्षणाद्वारे एक लाख विद्यार्थ्यांना दहा हजार मासिक स्टायपेंड देणार आहे. अंगणवाडी आणि आशा वर्कर कर्मचाऱ्यांना १५ हजार मासिक वेतन, सौर व अक्षय ऊर्जेला प्राधान्य देताना वीजबिल ३० टक्के कमी करण्यात येणार आहे. अत्यावश्यक वस्तूंच्या किमतीवर आळा, वृध्द पेंशन धारकांना महिन्याला २१०० रुपये अशी आश्वासनेही देण्यात आली आहेत. लाडकी बहीण योजना, ४४ लाख शेतकऱ्यांना मोफत वीज, ५२ लाख कुटुंबांना तीन मोफत गॅस सिलेंडर, आर्थिक दुर्बल घटकातील मुलींना मोफत शिक्षणाचा समावेश, गरीब, मध्यमवर्गीय, युवक, महिलांच्या कल्याणासाठी... या जनतेच्या केंद्रस्थानी असलेल्या अनेक योजनांचा समावेश आहे. या योजनांना फार मोठा प्रतिसाद राज्यातील कानाकोपऱ्यातून मिळाला आहे. विशेष म्हणजे या सर्व योजना कुटुंब असेल किंवा युवक, महिला-भगिनींना आधार देण्याचा प्रयत्न केला आहे. या योजना जनतेच्या मनात खोलवर गेल्या आहेत असे सुनिल तटकरे यांनी यावेळी स्पष्ट केले. राष्ट्रवादी काँग्रेसकडून सुमारे ३६ पानांचा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला असून या जाहीरनाम्याच्या मुखपृष्ठावर महाराष्ट्रवादी घोषणापत्र असे छापण्यात आले आहे. शिवाय आपल्या मतदारसंघातील विकासकामे आणि घोषणापत्रांच्या माहितीसाठी ९८६१७१७१७१ हा हेल्पलाईन नंबर देण्यात आला आहे.

------------

## उमेदवाराने माझ्या नावाचा व फोटोचा

लागले आहे. बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये तीन शिरसागर निवडणूक लढवतील असे म्हटले जात होते. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी सुद्धा विधानसभा निवडणुकीची जोरदार तयारी सुरू केली होती. अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर ऐनवेळेला त्यांनी माघार घेतल्याने बीड मतदार संघामध्ये याची जोरदार चर्चा झाली. एका फोनमुळे उमेदवारी माघार घेण्यात आली, कुटुंबातील चर्चेमुळे माघार घेण्यात आली, असे वेगवेगळे तर्क लावण्यात आले. माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी महायुतीचे उमेदवार योगेश क्षीरसागर यांना पाठिंबा दिल्याची ही चर्चा होती. मात्र आता ही चर्चाच असल्याचे त्यांच्या या पोस्टमुळे समोर आले आहे. लवकरच कार्यकर्त्यांशी चर्चा करून आपण विधानसभा निवडणुकी संदर्भात पुढील निर्णय तर असल्याचे सांगून कुठल्याही उमेदवाराने माझ्या नावाचा आणि फोटोचा गैरवापर करू नये असेही त्यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतर जयदत्त क्षीरसागर कोणाला पाठिंबा देतात याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे.

---------

## अजित दादाच्या नेतृत्वाखाली

तथा महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांच्या हस्ते मुंबईतून बुधवारी (दि.६) पक्षाच्या जाहीरनाम्याचे प्रकाशन करण्यात आले. तर बीडमधून पक्षाच्या संपर्क कार्यालयात प्रकाशन सोहळ्यासाठी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या नेतृत्वात प्रकाशन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष ॲड.प्रज्ञा खोसरे, माजी नगरसेवक गणेश वाघामारे, बाबुराव दुधाळ, प्रेम चांदणे, रणजित बनसोडे, भास्कर जाधव, राष्ट्रवादी डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ.रमेश शिंदे, युवक तालुकाध्यक्ष नंदू कुटे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. पुढे बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने अद्ययावत आरोग्य सुविधेचा वादा, सर्वांनी शिक्षणाच्या पायाभरणीचा वादा, दर्जेदार आणि पायाभूत सुविधांचा वादा, शेती व शेतकऱ्यांच्या विकासाचा वादा, सामाजिक विकासाचा वादा, असे सगळे वादे ना.अजितदादा पवार हे या निवडणुकीत घेऊन आलेले आहेत. त्यांच्या दूरदृष्टी नेतृत्वात महाराष्ट्र राज्याचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. आजपर्यंत आपणही बीड शहरात, ग्रामीण भागात असतील, ज्या काही सुविधा उपलब्ध करून देऊ शकलो, त्या ना.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आतापर्यंत देऊ शकलेलो आहोत. यापुढेही बीड तालुका, शिरूर तालुक्याच्या भागात मोठ्या प्रमाणावर विकासकामे करण्यात येणार आहेत. त्यामुळे सर्वांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीशी भरभक्कमपणे उभे राहावे, असे आवाहन देखील डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले आहे.

**राष्ट्रवादीचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष**
**आ.इद्रिस नाईकवडी यांचे जंगी स्वागत**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष तथा आमदार इद्रिस नाईकवडी हे बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर आहेत. त्यांचे बीडमध्ये आगमन झाल्यानंतर जंगी स्वागत करण्यात आले. त्यांनी अल्पसंख्याक समाजातील नागरिकांशी संवाद साधला. त्यांचे बीडमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. ते अल्पसंख्याक समाजाच्या मेळाव्याला संबोधित करणार होते. कार्यक्रमासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

----------

**अमेरिकेत पुन्हा**

सर्वात खालच्या स्तरावर गेली आहे. अमेरिकेत होत असलेल्या या बदलाचा इराणवर खूप वाईट परिणाम होत असल्याचे दिसत आहे. इराणची करन्सी आतापर्यंतच्या सर्वात खालच्या स्तराला जाऊन पोहोचली आहे. कारण डोनाल्ड ट्रम्प यांचा विजय हा इराणसाठी चांगले संकेत नाहीत. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या मागच्या कार्यकाळातही इराणवर अनेक प्रतिबंध लादले होते. ते इस्रायलचे कट्टर समर्थक आहेत. त्यांनी खुर्ची संभाळताच इराणचे वाईट दिवस सुरु झाले आहेत. इराणची मुद्रा रियाल बुधवारी आतापर्यंतच्या आपल्या सर्वात खालच्या स्तराला पोहोचली आहे. इराणसह बांग्लादेश आणि चीनसाठी सुध्दा ही धोक्याची घंटा आहे.

------------

**विकासाचे टाईमिंग साधण्यासाठ**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी व महायुतीचे अधिकृत उमेदवार विजयसिंह पंडित यांच्या प्रचारार्थ 'जाहिरनामा घोषणापत्र' चा प्रकाशन व पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पाडळसिंगी येथील अमोल काळे यांच्या प्रयत्नांतून गीतकार व गायक मिलिंद शिंदे यांनी गायलेल्या प्रचार गितांचे लाँचिंग करण्यात आले. या समारंभाला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित, महायुतीचे उमेदवार विजयसिंह पंडित, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, रिपाईचे तालुकाध्यक्ष किशोर कांडेकर, रिपाई कवाडी गटाचे अनिल तुरूकमारे, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष दादासाहेब चौधरी, वीर लहूजी साळवे बहुजन क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष दादासाहेब रोकडे यांच्या हस्ते जाहिरनामा प्रकाशित करण्यात आला. पत्रकार परिषदेत माहिती देताना विजयसिंह पंडित म्हणाले की, केंद्रात व राज्यात सत्ता असताना दहा वर्षे आमदार राहिलेले विद्यमान लोकप्रतिनिधी हे फक्त कोल्हेर रोडच्या विकासातच मग्न आहेत. कोल्हेर रोडचाच विकास करणाऱ्या व आजारी असल्याचे कारण सांगून मागील चार ते पाच वर्षे नॉट रिचेबल राहणाऱ्याला गेवराईकर नक्कीच धडा शिकवतील असे सांगून येणाऱ्या काळामध्ये आपण गेवराईतील अतिक्रमण बाधितांना पीटीआर देण्यासाठी प्रयत्न करू, तालुक्यातील तिर्थक्षेत्र व पर्यटन स्थळांचा विकास करण्याबरोबरच विकासाच्या अनेक योजना राबविल्या जातील. जाहिरनाम्यामध्ये आपण करावयाच्या कामाची सर्व वचने दिली असून ती प्रामाणिकपणे पूर्ण केली जातील असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी बोलताना माजी आमदार अमरसिंह पंडित म्हणाले की, विकासाचे न बोलता उटसूट आमच्यावर टिका करणाऱ्या विद्यमान आमदाराला गल्लीतून चौकात आम्हीच आणले आहे. दोन्ही विरोधकांमध्ये छुपी युती आहे, त्याला मतदार कधीच फसणार नाहीत. आम्ही कधीच राजकीय जीवनात संकुचित विचार करून राजकारण केलेले नाही, सर्वांगिन विकास हाच आमचा ध्यास असून शहरातील अहिल्यानगर, साठेनगर, गौरीपूरनगर, कल्पेश्वर मळा येथील रस्ते आणि उमापूर व तलवाडा येथे मुस्लिम समाजासाठी आधुनिक सुविधांनी युक्त असा शादीखाना उभारण्यात येईल असा शब्द त्यांनी यावेळी दिला. यावेळी राष्ट्रवादी पक्ष व इतर मित्र पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-------------

**बीडच्या तरुणाईची इन्कमिग**

यांच्याकडे जाहीर प्रवेश केला आहे. अनिलदादा जगताप हे तळागाळातील माणसांची जाण लोकप्रिय नेते आहेत. बीड विकासाची धुरा अनिलदादा यांच्या हाती आल्यास ते बीड विकासाचा कायापालट करतील. असा विश्वास व्यक्त करत बीड मतदार संघातील माळस जवळा गावच्या अविनाश पाटोळे ग्रामपंचायत सदस्य माळस जवळा, सचिन पाटोळे, दत्ता पाटोळे, अभिषेक पाटोळे, अरविंद पाटोळे, करण पाटोळे, केशव पाटोळे, योगेश पाटोळे, आकाश गवळी, आकाश सोनवणे, अशोक लोखंडे, रणजित पाटोळे, नागेश पाटोळे, शहादेव पाटोळे, रमेश पाटोळे, रवींद्र पाटोळे, महादेव पाटोळे, गणेश पाटोळे, दिलीप पाटोळे यांच्यासह शेकडो पाटोळे मित्रपरिवाराने अनिलदादा जगताप यांच्याकडे काल दि. ६ नोव्हेंबर रोजी रात्री ८.०० वाजताच्या दरम्यान जाहिर प्रवेश करत त्यांच्या विजयासाठी वज्रमुठ आवळली आहे. अनिलदादा जगताप यांनी सर्व तरुणांचे सहर्ष स्वागत करत त्यांचा स्वतःकडे प्रवेश करून घेतला. दरम्यान अनिलदादा जगताप यांनी माळस जवळा येथील तरुणाईचे साथ विधानसभा निवडणुकीत मोलाची भूमिका बाजावेल असा विश्वास व्यक्त केला. निवडणूक प्रचाराचा नारळ फुटण्याअगोदर बीडच्या तरुणाईची इन्कमिग बळ वाढवणारी आहे. तसेच आता खऱ्या अर्थाने भरकटलेली तरुणाई योग्य ठिकाणी आली असल्याची भावना अनिलदादा जगताप यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान व्यक्त केली. याप्रवेश सोहळ्या प्रसंगी अनिलदादा जगताप यांचे कार्यकर्ते, समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

## माझी निवडणूक जनतेने

गावी मतदान केंद्रात मोठ्या संख्येने '' शिट्टी '' य चिन्हावर मतदान करुन घ्यावे. या मतदार संघात बोगस कामे खरुन भ्रष्टाचार होत आहे. समोरिल उमेदवार हे तर भ्रष्टाचाराचे महामेरु आहेत त्यामुळे भ्रष्टाचार संपविण्याठी आणि आष्टी विधानसभा मतदार संघातील दहशतवाद निपटून काढण्यासाठी सज्ज हावे असे आवाहन अपक्ष उमेदवार माजी आ.भीमराव धोंडे यांनी केले. आष्टी येथील बाजार तळावर आयोजित प्रचार शुभारंभाच्या सभेत ते बोलत होते. या सभेचे अध्यक्षस्थानी माजी सभापती ॲड.साहेबराव म्हस्के हे होते. यावेळी सौ.दमयंतीताई धोंडे,युवा नेते डॉ.अजयदादा धोंडे,पाटोदा पंचायत समितीच्या सभापती सौ. सुवर्णाताई लांबरुट,जिल्हा परिषद सदस्य वर्षाताई माळी,रामराव खेडकर असंख्य मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्रस्ताविक ॲड. रत्नदीप निकाळजे यांनी केले.युवा सरपंच दादासाहेब जगताप,भटके विमुक्तांचे पाटोदा तालुक्यातील नेते राजपाल शेंडगे,गौतम ससाणे, बाळासाहेब पवार,माऊली पानसंबळ,अशोक दहिफळे, महाराष्ट्र केसरी पैलवान सईद चाऊस,माजी सभापती सुवर्णाताई लांबरुड,धनगर समाजाचे नेते देविदास शेंडगे,पांडुरंग गावडे, कु.गवळी,रिपाईचे तालुकाध्यक्ष अशोक साळवे,अशोक सव्वाशे, माजी सभापती नियामत बेग, पांडुरंग नागरगोजे,रामराव खेडकर, लालासाहेब कुमकर,अजयदादा धोंडे यांची भाषणे झाली. यावेळी बोलताना अपक्ष उमेदवार माजी आ.भीमराव धोंडे म्हणाले की,मतदार संघात शिट्टीच्या विजयासाठी फेऱ्या,रली काढाव्यात,जनजागृती करावी. शिट्टी या चिन्हासमोरील बटन दाबून मोठ्या मताधिक्याने मला निवडून द्यावे असे भावनिक आवाहन करीत गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये भाजपच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचा पराभव झाला आणि माझे विधानसभेचे तिकीट कापले गेले. मात्र ज्यांनी लोकसभेला पंकजाताईंच्या विरोधात काम केले त्यांना भाजप पक्षाने तिकीट दिले. गेल्या चार महिन्याच्या काळामध्ये आपण आष्टी,पाटोदा,शिरूर विधानसभा मतदार संघातील सर्व गावे पिंजून काढली.केवळ लोक आग्रहास्तव आपण अपक्ष निवडणूक लढविण्याचे ठरविले आहे. आपल्याला शिट्टी हे चिन्ह आता मिळालेले आहे.शिट्टी हे चिन्ह खूप लकी आहे.२०१९ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये आत्ता जे कमळाच्या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत त्यांनी आपल्या विरोधात काम केले.आपल्याकडून पैसेही घेऊन गेले मात्र ते पैसे परत देण्याची अजून नाव घेत नाहीत. त्यांना फक्त घ्यायचे माहित आहे द्यायचे माहित नाही.आष्टी,पाटोदा, शिरूर मतदार संघामध्ये गेल्या पाच वर्षात कुठलीही विकास कामे झाली नाहीत मात्र जलजीवन मिशनच्या कामांमध्ये ३०० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे असा घणाघाती आरोप भीमराव धोंडे यांनी विरोधकांवर केला. मतदार संघात '' त्यांना '' भ्रष्टाचाराचे '' महामेरू '' म्हणून ओळखले जाते अशीही टीका धोंडे यांनी केली. माझ्या आमदारकीच्या काळामध्ये मी रस्ते,पिण्याचे पाणी,पाझर तलाव अशी अनेक विकासाची कामे केली.त्यांच्या जामगावला जाणारा रस्ता सुद्धा मी केला. आष्टी,पाटोदा,शिरूर मतदार संघात १ हजार पाझर तलाव बांधले.मात्र गेल्या ५ वर्षाच्या काळामध्ये मतदार संघांमध्ये दडपशाही, हुकूमशाही आणि दहशतवाद माजला आहे. हा दहशतवाद, दडपशाही आणि हुकूमशाही आपल्याला समूळ नष्ट करायची आहे.मतदार संघात कोणावरही अन्याय झाला तरी आम्ही त्यांच्यावरील अन्याय दूर करण्यासाठी धावून जाऊ मात्र त्यासाठी आपल्याला ही निवडणूक अत्यंत बहादुरीने लढावी लागणार आहे. ही निवडणूक तशी सोपी नाही मात्र निवडणूक जनतेने हातात घेतली आहे,त्यामुळे आपला विजय निश्चित आहे असे भीमराव धोंडे म्हणाले. यावेळी युवा नेते डॉ. अजयदादा धोंडे म्हणाले की, आपली शिट्टी २३ नोव्हेंबरपर्यंत वाजली पाहिजे आणि २३ नोव्हेंबरला आपल्याला विजयाचा गुलाल घ्यायचा आहे.तेव्हा कोणीही गाफील राहू नये.आम्ही कधी कुणाशी गद्दारी केली नाही आणि भविष्यात पण करणार नाही असे ते म्हणाले. अध्यक्षीय भाषणात ॲड.साहेबराव म्हस्के म्हणाले की,२००९ साली लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या विरोधात असणाऱ्या माणसाला भाजप पक्षाने उमेदवारी दिली.धोंडेसाहेबांनी आतापर्यत भाजपचे आदेश पाळलेले आहेत. सध्या भाजप पक्ष आंधळा झाला आहे.आ.पंकजाताई मुंडे यांना पक्षात मोठे स्थान राहिलेले नाही.मी भाजपाचा तालुकाध्यक्ष असलो तरी ते पद मोठे मानत नाही.पंकजाताई आमची पार्टी तर धोंडे हा आमचा पक्ष आहे. तालुकाध्यक्षपदाचा आता राजिनामा देतो.आमदार हा तालुक्यात भांडणे लावण्यासाठी नसतो. विकासकामे करण्यासाठी असतो.धोंडेसाहेबांच्या आमदारकीच्या काळात आष्टी पोलीस ठाण्यात सर्वात कमी गुन्ह्यांची नोंद झाली म्हणून पोलीस ठाण्याला आयएसओ मानांकन मिळाले होते.भुमीबचाव आंदोलन,आष्टी ते दिल्ली पदयात्रा,कुकडी पाण्यासाठी आष्टी ते मुंबई शेतकऱ्यांचा मोर्चा धोंडेसाहेबांनी केला. वास्तविक पाहता लोणी ते खडकत पट्ट्यातील शेतकरी व मतदारांनी एकमुखी धोंडेसाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन उतराई केली पाहिजे.पंकजाताई मुंडे यांचा लोकसभा निवडणुकीत झालेला पराभव जिव्हारी लागलेला आहे.आता बदला घेण्याची वेळ आलेली आहे असे ॲड.म्हस्के म्हणाले. रिपाईचे रत्नदीप निकाळजे यांनी प्रास्ताविक केले.निलेश दिवटे यांनी बहारदार सूत्रसंचालन केले तर प्रकाश बडे यांनी आभार मानले. अपक्ष उमेदवाराच्या प्रचार सभेच्या ठिकाणी भाजपाच्या विधान परिषदेचे आमदार पंकजाताई मुंडे यांचा फोटो झळकत होता. संपूर्ण सभेतुन बोलणाराचा रोष व्यक्तींशा महायुतीचे उमेदवार सुरेश धस यांच्या वर होता .पुढील काही दीवसात हे निवडणुक मराठा ओ बी सी करण्याचा डाव.. सभेला संबोधित करताना उमेदवारा कडुन नकळत तुतारीचा चिन्हाचा उल्लेख.

------

## मी आमदार झालो तर सर्व पोरांचे

परळी विधानसभा मतदारसंघात विद्यमान आमदार धनंजय मुंडे विरुद्ध राजेसाहेब देशमुख यांच्यात लढत होत आहे. नुकताच राजेसाहेब देशमुख यांनी प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी त्यांनी केलेल्या अजब आश्वासनाची जोरदार चर्चा रंगली आहे.

## जाहीर प्रगटन

आमचे पक्षकार नामे यांनी दिलेल्या माहिती व सूचने नुसार सर्व जनतेस कळविण्यात येते की, र.डी.जि.प.बीड सब डि.पं.स.व धारूर ता.धारूर पैकी गाव तेलगाव गट क्र नंबर १६१ जमीन/प्लॉट मालक नाव ऋषिकेश बबनराव ढास यांच्या नावे शेत जमीन/प्लॉट असे असून असून ज्याचे क्षेत्र ०० हेक्टर ४० आर आहे.

आमचे पक्षकार यांनी इसार पावती आधारे या आगोदरच घेतलेले आहे ऋषिकेश बबनराव ढास रा. तेलगाव ता, धारूर जि.बीड यांच्या कडून आमचे पक्षकार यांनी नोंदणीकृत खरेदी खत करून घेण्याचे ठरविले आहे.

**शेत जमीन/प्लॉट गट क्र. १६१ ची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.**
**पर्वेस-विजय तुकाराम चोथवे.**
**पश्चिमेस - धारूर तेलगाव महामार्ग.**
**दक्षिणेस-रामहरी कारभारी थेटे.**
**उत्तरेस-श्रीकृष्ण पार्क.**


येणे प्रमाणे चतु:सिमेच्या आतील शेत जमीन/प्लॉट बाबत नोंदणीकृत खरेदी खत आधारे व्यवहार करण्याचे ठरलेले असून लवकरच सदरील शेतजमीन/प्लॉट खेदिखत आधारे विकत घेण्याचा व्यवहार आमच्या पक्षकाराने करावयाचा ठरवलेला असून लवकरच. सदर शेत जमीन/प्लॉट हे निर्विवाद, निर्जोखमी आहे. असे ऋषिकेश बबनराव ढास यांनी आमच्या पक्षकारास सांगितलेले आहे. तरी सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, वरील शेत जमीन/प्लॉट च्या संदर्भात कोणाचे काही हितसंबंध वाटणी, गहाणखत, बक्षीसपत्र, ईसारपावती, करारनामा, कर्ज बोजा, कर्ज व देवाण-घेवाण, मुख्त्यारपत्र, बक्षीसपत्र, इसारपावती, करारनामा, वचनचिठ्ठी, रजिस्टर्ड खरेदीखत, चोळीबांगडी इतर हक्क असेलतर सबळ पुराव्यानिशी १५ दिवसांच्या आत आमच्याशी संपर्क साधवा व उजरदारी करावी कोणाचाही मुदतीत आक्षेप अथवा उजर आला नाही तर कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरून सदरील शेतजमिनीचे चे खरेदीखत आमचे पक्षकार करून घेतील व त्या नंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. करीता हे जाहीर प्रगटण.

**जाहीर प्रगटन देणार**
**ॲड. एन.के. सिरसट. जिल्हा व सत्र न्यायालय, बीड. मो.नं. ९८२३२०४८७५.**

## अंबाजोगाईत आज सामुहिक श्रीसूक्त हवनचे आयोजन

अंबाजोगाई । प्रतिनिधी
अंबाजोगाई शहरात आज गुरूवार, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी परमपूज्य बहुसोमयाजी यज्ञमार्तंड यज्ञेश्वर सेलूकर महाराज यांचे प्रमुख उपस्थितीत सामुहिक श्रीसूक्त हवनचे आयोजन करण्यात आले आहे.

माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीचा संयुक्त पुढाकाराने आज गुरूवार, दिनांक ७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता योगेश्वरी देवी मंदिर परीसर, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आलेल्या सामुहिक श्रीसूक्त हवन कार्यक्रमासाठी शहर व परिसरातील नागरिकांनी सर्वांनी लाभ घ्यावा अशी विनंती व आवाहन आयोजक माहेश्वरी महिला मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे. श्रीसूक्त हवनसाठी आवश्यक असणारे साहित्य कार्यक्रम स्थळी उपलब्ध आहे. अशी माहिती ही माहेश्वरी महिला मंडळ व यज्ञ सेवा समितीच्या वतीने देण्यात आली आहे.



# मुस्लिम समाजाचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न करणार - आमदार कैलास गोरंट्याल

जालना । प्रतिनीधी
मुस्लिम समाजाच्या समस्या आणि प्रलंबित असलेले प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी येथे बोलतांना दिली.



शहरातील जुना जालना भागातील आयेशा लॉन्स मध्ये काल सोमवारी सायंकाळी आयोजित करण्यात आलेल्या मुस्लिम समाजाच्या विराट सभेत मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ नेते एकबाल पाशा, नवाब डांगे, बदर चाऊस, अब्दुल रौफ परसूवाले,अकबर खान, हमीद मौलाना, महंमद इफ्तेखार बद्रोद्दीन, महंमद चौधरी, वाजेद पठाण, शेख फारुख सय्यद याकूब आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलतांना गोरंटयाल म्हणाले की, मुख्यमंत्री कोणत्याही जाती धर्माचे असो ते एकदा मुख्यमंत्री पदाच्या खुर्चीवर विराजमान झाले की, त्यांच्यासाठी सर्वच जाती धर्माचे लोक हे समान असतात. मात्र, सध्याच्या मुख्यमंत्र्यांनी पदाची गरिमा न राखता महापुरुषा विषयी बेताल वक्तव्य करणाऱ्या रामगिरी महाराजांची पाठराखण करत मुस्लिम समाजाच्या भावनांना ठेच पोहचवण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी केवळ आपणच केली होती याची आठवण करून देत गोरंटयाल म्हणाले की, मागील काही दिवसात ज्यांची आपल्यामुळे चुकून मन दुखावली असेल त्यांची आपण जाहीर माफी मागतो. महाविकास आघाडीच्या जागा वाटपात शंभर जागा कॉंग्रेस पक्षाच्या वाट्याला आल्या असून त्यापैकी दहा जागेवर कॉंग्रेस पक्षाने मुस्लिम समाजाचे उमेदवार दिल्याचे गोरंटयाल यांनी यावेळी स्पष्ट केले. शहरातील ऐतिहासिक मूर्ती वेस उभारण्या बरोबरच मुस्लिम समाजाच्या असलेल्या अडीअडचणी आणि त्यांचे प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहील अशी ग्वाही शेवटी त्यांनी दिली. यावेळी एकबाल पाशा, नवाब डांगे, अकबर खान, अरमान शेख, अब्दुल रौफ परसूवाले, शेख फारुख, शेख रशीद, वाजेद पठाण, आमेर पाशा, फारुख तुंडीवाले, शेख आरेफ आदींनी आपल्या भाषणातून सद्य परिस्थितीत सुरू असलेल्या राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकून ही परिस्थिती बदलण्यासाठी विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे जालन्यातील उमेदवार कैलास गोरंटयाल यांना विजयी करण्याचे आवाहन मुस्लिम समाजाला केले. यावेळी गर्दीने खचाखच भरलेल्या आयेशा लॉन्स मध्ये उपस्थीत पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी गोरंटयाल यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी देत त्यांना मोठया मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार करण्यात आला. यावेळी प्रास्ताविक कॉंग्रेस अल्पसंख्यांक आघाडीचे जिल्हाध्यक्ष शेख अब्दुल रफीक यांनी केले. संचलन नजीब लोहार यांनी तर शेवटी आभार शेख शकील यांनी मानले. कार्यक्रमास अतिक खान, आरेफ खान, सय्यद अझहर, रहीमभाई तांबोळी, वसीम शेख, अब्दुल हमीद, सय्यद जमील, अमजद पठाण यांच्यासह मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी, युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आष्टीच्या तहसील कार्यालयात खाजगी राइटरचा वावर, याला जबाबदार कोण? जिल्हाधिकारी कारवाई करणार का?

**पुरवठा विभाग व जमावबंदी विभागात कोण ते खाजगी राइटर तहसीलदार यांनाच माहिती नाही? यांना आर्शिवाद कोणाचा ? कारभार कोण हाकतो, यांची चौकशी करण्याची मागणी**

म्हसोबावाडी। प्रतिनिधी
आष्टी शहरातील तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात व जमावं बंदी विभागात अनेक वर्षांपासून दोन खाजगी राइटरचा वावर चालू असून तो कोणाच्या आर्शिवादाने कार्यालयात मनमानी कारभार सांभाळत आहे त्याला वचक कोणाचा राहिला नसून याला जबाबदार कोण याबाबत तहसीलदार यांनी कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

आष्टी तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात व जमावं बंदी विभागात खाजगी राइटरचा वावर सुरू असून नागरिकांची हे खाजगी राइटर कुंपण व कुंपण दूरूस्तीसाठी पिळवणूक करीत असून चिरीमिरी घेतल्याशिवाय कोणतेच काम करत नाहीत आणि त्यांच्यावर आजपर्यंत कोणत्याच तहसीलदार अधिकारी यांनी कारवाई केली नाही याला जबाबदार कोण? हे अनेक वर्षांपासून या कार्यालयात राहत असून गोरगरीब नागरिकांची पिळवणूक करीत असल्याचा प्रकार चालू आहे. संबंधित अधिकारी यांना माहिती असून पण ते याकडे दूर्लक्ष करतात कारण त्यांना यात तडजोड करून काही चिरीमिरी मिळत असेल का असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकांना पडला आहे. जो कोणी खाजगी राइटर आहे त्याला तात्काळ काढून त्याच्यावर कारवाई करणार आणि याला जबाबदार जो कोण कर्मचारी आहे यांच्यावर पण कार्यवाही करणार असल्याची माहिती स्वतः तहसीलदार वैशाली पाटील यांनी दूरध्वनीवरून पत्रकारांशी बोलताना सांगितले. याबाबत जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याशी पत्रकार यांनी संपर्क केला असता त्यांनी सांगितले की संबंधित तहसीलदार यांना याप्रकरणी सूचना देऊन कारवाई करण्यात येईल असे दूरध्वनीवरून बोलताना सांगितले.

## डॉ.नवनाथ घुगे यांना आय.एम.ए चा राज्यस्तरीय पुरस्कार जाहिर

अंबाजोगाई । प्रतिनिधी
अंबाजोगाई शहरातील प्रसिद्ध असे हृदयरोगतज्ञ डॉ.नवनाथ घुगे यांना यंदाचा आय.एम.ए च्या वतीने दिला जाणार राज्यस्तरीय आय.एम.ए. एम.एस.प्रेसिंडेट ॲप्रेसिएशन ॲवॉर्ड जाहिर करण्यात आला आहे. याचे वितरण येत्या ०८ नोव्हेबर रोजी ठाणे मुंबई येथे मान्यवरांच्या उपस्थितीत केले जाणार आहे. डॉ.नवनाथ घुगे यांना जाहिर झालेल्या पुरस्काराबद्दल सर्वस्तंरातून अभिनंदन केले जात आहे.

डॉ.नवनाथ घुगे हे गेल्या २० वर्षापासून अंबाजोगाई शहरात हृदयरोगतज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यापूर्वी त्यांनी मुंबई येथील नामांकित असलेल्या केईएम हॉस्पिटल असो किंवा त्या ठिकाणचे लिलावती हॉस्पिटल असो त्या ठिकाणी उत्कृष्ट व उत्तम सेवा दिलेली आहे. त्यादरम्यान त्यांच्या हातून देशाचे तत्कालीन पतप्रधान अटलबिहारी वाजपेयी, सिनेअभिनेते महानायक अमिताभ बच्चन यांच्यावर उपचार करण्याची संधी त्यांना प्राप्त झालेली आहे. चांगल्या ठिकाणी चांगली सेवा करत असताना त्यांनी आपल्या ग्रामीण भागातील माणसांची सेवा करता यावी या साठी महानगर सोडून थेट अंबाजोगाई गाठले आणि या ठिकाणी २० वर्षापासून अविरत सेवा सुरु आहे. गेल्या २० वर्षामध्ये असंख्य रुग्णांना मृत्युच्या दाढेतून बाहेर काढलेले आहे. अनेक रुग्णांना त्यांच्यामुळे नवसंजीवनी मिळालेली आहे.



शहरातील सामाजिक कार्यामध्ये त्यांचे मोठे योगदान आहे. शिक्षण महर्षी नारायणदादा काळदाते स्मृती समारोह, आधार माणुसकीचा व इतर उपक्रमात त्यांचा पुढाकार असतो. शिवाय आयएमए अंबाजोगाईचे अध्यक्ष म्हणून ते कार्यरत आहेत. रोटरीचे पदाधिकारी म्हणून काम करतात.एक संवेदनशील व्यक्तीमत्व म्हणून त्यांचा लौकिक आहे. अशा या व्यक्तीमत्वाला अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे.आयएमए ही राष्ट्रीय स्तरावर डॉक्टरासाठी काम करणारी संस्था आहे.आय एम ए च्या कामाच्या बाबतीत व्यापकता निर्माण करून वर्षभरात वेगवेगळे उपक्रम राबवले या कामाची दखल घेवून त्यांना आय एम ए संस्थेच्या वतीने डॉ.घुगे यांना २०२३-२४ चा राज्यस्तरीय आयएमए एम.एस.प्रेसिडेंट ॲप्रेसिएशन ॲवॉर्ड जाहिर करण्यात आला आहे. या पुरस्काराचे वितरण येत्या ८ नोव्हेबर रोजी मुंबई ठाणे येथे सायंकाळी ७ वाजता सुप्रिम बँकट, डॉ.काशिनाथ घाणेकर सभागृह,ठाणे मुंबई येथे वितरीत केला जाणार आहे. त्यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्वस्तरांतुन अभिनंदन व कौतुक होत आहे.

## ओबीसी संघर्ष समिती जिल्ह्यात निर्णायक भूमिका घेणार

### ओबीसी नेत्या प्रा.सुशिलाताई मोराळे यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच जिल्हाव्यापी बैठक-प्रा.देविदास चव्हाण

**वडवणी । प्रतिनिधी**
बीड जिल्ह्याच्या इतिहासामध्ये १९८० पासून ओबीसी संघर्ष समितीच्या माध्यमातून ओबीसी,वंचित,उपेक्षित,दिन दलीत,दुबळे व पिछलेल्या लोकांचे प्रश्न घेऊन रस्त्यावरची व कर्यालईन लढाई लढणाऱ्या आदरणीय प्रा.सुशीला ताई मोराळे हे ओबीसी चे स्वतंत्र नेतृत्व निर्माण झाले आहे. आदरणीय ताई साहेबांनी ओबीसी चे गेलेले राजकीय आरक्षण परत मिळावे म्हणून बीड जिल्ह्यातून



२५००० हजार हरकती नोंदविल्या होत्या,ओबीसी आरक्षण बचाव आंदोलन यात्रेतून तमाम ओबीसी बांधवांना जिवंत करण्याचे काम त्यांनी केले,तसेच राज्य पातळीवर तमाम ओबीसी



बांधवांची वज्र मूठ बांधून विधान सभेत ओबीसी च्या प्रश्नावर आवाज उठून आरक्षण पदरात पाडून घेण्याचे काम आदरणीय ताई नी केलेले असताना देखील आज कुठलाच पक्ष आणि संघटना विचारात न घेत असल्यामुळे बीड जिल्हा विधानसभा निवडणुकीत निर्णायक निर्णय घेण्यासाठी लवकरच प्रा.सुशीला ताई मोराळे यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी संघर्ष समितीची बैठक आयोजित करण्यात येणार आहे असे आवाहन प्रा. देविदास चव्हाण जिल्हा अध्यक्ष ओबीसी संघर्ष समिती बीड यांनी केले आहे या प्रसंगी प्रा.वैजनाथ शिंदे,बबनजी आंधळे,गणेश ढाकणे व इतर ओबीसी कार्यकर्ते उपस्थित होते.

पान ६ वरून...

### आ. पंकजाताई मुंडेंच्या

करत त्यांचं जंगी स्वागत केलं. भाजपा महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते यात मोठया संख्येने सहभागी झाले होते.

माधुरीताईंना विक्रमी मताधिक्य मिळेल

ही प्रचाराची रॅली नसून माधुरीताईंच्या विजयाचीच ही रॅली आहे. माधुरीताई माझी मोठी बहिण आणि मैत्रीण देखील आहे. लोकनेते मुंडे साहेबांपासून आमचं आणि त्यांच्या परिवाराचे जिव्हाळ्याच नातं आहे. आम्ही विधानभवनात एकत्र काम केले आहे, त्यांनी सर्व सामान्य जनतेच्या भल्यासाठी चांगले काम केले आहे, त्यामुळे या निवडणुकीत त्या चौथ्यांदा मोठया मताधिक्याने विजयी होतील यात शंका नाही. महायुती सरकारने लाडक्या बहिणीचा सन्मान केला. जनतेला धान्यापासून ते घरापर्यंत अनेक योजना दिल्या. गेल्या ७५ वर्षात जेवढे काम झाले नाही तेवढे १५ वर्षात झाले. माधुरीताई सर्व सामान्य जनतेच्या उमेदवार असल्याने त्यांचा विजय कोणी रोखू शकत नाही अशा शब्दांत यावेळी आ. पंकजाताईंनी मतदारांशी संवाद साधला.

### आष्टी विधानसभा मतदारसंघात

बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.

बैठकीस शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामाजी जाधव साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी संबोधीत केले व आष्टी विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मेहबूब भाई शेख यांना प्रचंड मतांनी विजयी करण्यासाठी कामाला लागावे असे सांगितले..

यावेळी जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,आष्टी तालुकाप्रमुख सुभाष राऊत,शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, पाटोदा तालुकाप्रमुख मुकुंद शिंदे,आष्टी विधानसभा प्रमुख नवनाथ आटोळे,राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. नदीम शेख,सहकार सेनेचे ठकसेनजी तुपे,युवासेना उपजिल्हा युवाधिकारी सचिन अरुण,युवासेना उपजिल्हा युवाधिकारी कृष्णा चौरे,आष्टी शहर प्रमुख महेश एकशिंगे,आष्टी तालुका युवा अधिकारी शिवप्रसाद जाधव, आष्टी युवा शहर अधिकारी रंगनाथ आजबे,तालुका संघटक ज्ञानदेव मुटकुळे,उप तालुका प्रमुख संदीप हाडे,उप तालुका प्रमुख अक्षय साप्ते, उप तालुका प्रमुख अक्षय साप्ते, गटप्रमुख रामदास मोहिते,गणप्रमुख देविसिंग बिसेन अजय गायकवाड, लाला भाई पठाण सह शिवसेना, युवासेनेचे सर्व आजी माजी पदाधिकारी उपस्थित होते...!!

### राष्ट्रवादी कॉंग्रेसचा माजलगाव

अच्युतलराव लाटे, सभापती जयदत्त नरवडे, मा. सभापती संभाजी शेजुळ, चंद्रकांत शेजुळ यांची उपस्थिती होती. मी दहशतवादी किंवा गुंड असतो तर माधव निर्मळ सारखा कार्यकर्ता माझ्यासोबत राजकीय, सामाजिक दृष्ट्या अनेक वर्षे राहिला नसता. मी राजकारण करतांना व समाजकारण करतांना गुंडगीरी अथवा दहशतवादाचा वापर कधीच केला नाही व सोळंके कुटूंबीय करणार ही नाहीत. आम्ही केवळ विकास कामांवर मते मागतो. कै. सुंदरराव सोळंके यांच्या पुण्याईपासुन ते आपर्यंत आम्ही फक्त विकासकामेच केली. दहशतवाद किंवा गुंडगीरी नाही असे त्यांनी पत्रकाराला उत्तर देतांना सांगीतले.

### दलित, वंचित आणि

कुरेशी,दीपक निकाळजे, राजू निकाळजे,किशोर अडागळे,बाळासाहेब जावळे आदीसह आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील प्रमुख कार्यकर्ते व नागरीक उपस्थित होते.

पुढे बोलताना पप्पू कागदे म्हणाले की,सुरेश धस हे अत्यंत कार्यक्षम आणि धडाडीचे नेतृत्व असून आणि तीस वर्षापासून त्यांनी सरपंच पदापासून ते विधानसभा सदस्य आणि राज्यमंत्री पदापर्यंत काम करताना सतत समाजातील दलित शोषित वंचित असलेल्या समाज घटकांचा विकास हेच उद्दिष्ट समोर ठेवले त्यामुळेच ते राजकारणामध्ये यशस्वी झाले असून गेली ३० वर्षापासून त्यांनी चांगले काम केल्यामुळे त्यांची सर्वसामान्यांचा नेता अशी ओळख निर्माण झाली आहे राजकारण करत असताना त्यांनी या समाज घटकांना घरकुले वैयक्तिक नावाच्या योजना आणि महत्त्वाचे म्हणजे भूमिहीन समाज घटकाला गायरान जमिनी वरील अतिक्रमण नियमित करण्यासाठी त्यांनी शासन स्तरावर वेळोवेळी पाठपुरावा केलेला आहे अशा या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाला पुन्हा एकदा विधानसभेत पाठवण्यासाठी सर्वांनी त्यांच्या मागे आपली ताकद उभी करावी असे आवाहनही त्यांनी शेवटी केले यावेळी बोलताना आष्टी विधानसभा मतदारसंघातील भारतीय जनता पार्टी शिवसेना आणि रिपाई आठवले गट या माहितीचे उमेदवार सुरेश धस म्हणाले की पन्नास वर्षांपूर्वी माझे वडील रामचंद्र धस दादा यांनी जामगाव येथील विहीर दलित समाजाला खुली करून देऊन सामाजिक मध्ये चे उदाहरण घालून दिले आहे त्यांनी त्यांच्या सामाजिक आणि राजकीय कारकीर्दीमध्ये सतत या दलित शोषित आणि वंचित घटकांमध्ये सतत संपर्क ठेवला त्यांच्या या सामाजिक कार्याचा वसा आपण पुढे नेत असून माझ्या राजकीय यशामध्ये या सर्वसामान्य दीनदलित शोषित आणि वंचित जनतेचा मोठा वाटा आहे या भूमिहीन समाजाने गायरान जमिनीवरील केलेले अतिक्रमण नियमित करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयापासून मंत्रालयापर्यंत सतत प्रयत्नशील आहे आणि या पुढे देखील या कामी सतत प्रयत्नशील राहणार असल्याची ग्वाही दिली.

पान ६ वरून...

### स्व.पंडित अण्णांच्या काळात

आकर्षित होतील. आगामी काळात हे देखील पूर्ण करून आंबेजोगाई, परळी, शिरसाळा ते दिंद्रुड पर्यंत उद्योगांचे जाळे उभे राहील असा व्यापार व उद्योग क्षेत्रात भरारी घेण्याचा मानस असून त्या दृष्टीने मी नियोजन करत आहे असेही धनंजय मुंडे यांनी स्पष्ट केले.

मला स्वतःला कोणताही उद्योग व्यवसाय करण्यात किंवा संस्था उभारण्यात रस नाही, मलनाथपूर भिलेगाव परिसरात २५० एकर जमिनीवर शापूरजी पालनजी या सुप्रसिद्ध कंपनीला सोलार पार्क उभा करून दिला त्या ठिकाणी हजारावर रोजगारांची निर्मिती ही झाली आणि ८० मेगावाट २१ निर्मिती केली जात आहे. २००६-७ सालापासून न्यायालयीन लढा देऊन इंडिया सिमेंट फॅक्टरी परळीत उभी केली, पुढे अल्ट्राटेक कंपनी सुद्धा आता परळीत ६०० कोटींची गुंतवणूक करण्यास मान्य झाले असून तसा करारही करण्यात आला आहे. मात्र हे सगळे आपल्या विरोधकांना दिसणार नाही. फक्त परळीची आणि परळीच्या मातीची बदनामी करण्याचा एक कलमी कार्यक्रम त्यांचा आहे. त्यांना आता आपण सर्व परळीकरांनी मिळून धडा शिकवला पाहिजे, असेही पुढे बोलताना धनंजय मुंडे म्हणाले.

या स्नेह मेळाव्यास कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, प्रा. मधुकर आघाव, माऊली तात्या गडदे, जयपाल लाहोटी, मनीष झंवर, सतीश करमाळकर, सुशील डुबे, गोल्डीशेठ भाटिया, जगदीश चौधरी, अंबादास सुगावे, तसेच माऊली दादा फड, विजय सामत, शांतीलाल जैन, संदीप लाहोटी, बंडूशेठ गरुड, देवसटवार काका, विनोद शेठ सामत, नंदकिशोर विभा, सुभाष शेठ तोतला, पांडुरंग लाहोटी, गुलाबराव शेटे, विजय वाकेकर, अशोक कांकरिया, अनिल तांदळे, रतन कोठारी, राजगोपाल बंग, केदार सारडा, संजय दरक, सुनील कोटेचा, नवरतन शर्मा, लक्ष्मण मुंडे यांसह परळी शहर व तालुक्यातील व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आ.पवार काकांच्या प्रचारासाठी

गटातील वाडी वस्त्या तांडे शिवराज पवार यांनी पिंजून काढले. डोअर टू डोअर जाऊन काका लक्ष्मण पवार यांनी गेवराई मतदारसंघात तांडे - वस्त्या च्या विकासासाठी केलेल्या कामाची माहिती दिली. तांडे - वस्त्या च्या विकासासाठी आमदार लक्ष्मण पवार यांच्या टोरिक्षा चिन्हाचे बटण दाबून हात बळकट करा असे आवाहन शिवराज पवार यांनी पाचेगाव सर्कल संवाद दौऱ्या दरम्यान बोलतांना केले

यावेळी राहुल खंडागळे,लक्ष्मण चव्हाण,सरपंच रितेश साबळे, मधुकर यादव,प्रशोत्तम दाभाडे,गहिनीनाथ मते,रामभाऊ पवार, शेख ईसाक,विजय डरफे,दत्ता जाधव, प्रमेश्वर हाटोटे,सिध्दार्थ हाटोटे,अरुण हाटोटे,दादा खरसाडे,ओम घुळवे,मिटकरी,अशोक काळे,रामेश्वर हाटोटे,महादेव काळे,नुरभाई शेख,भय्या शेख,विकास राठोड,सुरेश लाखे,सुरेश हाटोटे,कृष्णा राठोड, बळीराम राठोड, संतोष राठोड, एकनाथ राठोड, शिवचरण जाधव, उत्तम चव्हाण, बबन राठोड, आकाश राठोड, प्रभु आडे,उत्तम राठोड, अर्जुन पवार,अविनाश राठोड, आदि उपस्थित होते

### लबाड क्षीरसागरांपासून

बीड शहरातील जालना रोड वरील अनिलदादा जगताप मध्यवर्ती कार्यालय येथे विधानसभा पूर्व नियोजन तथा निश्चय बैठकीचे आयोजन केले होते. याप्रसंगी अनिलदादा जगताप यांनी उपस्थित राहून सर्वांशी मुक्त संवाद साधत पुढील दिशा, ध्येयधोरण यावर सविस्तर चर्चा केली. बैठकीचे प्रास्ताविक प्रतिक कांबळेयांनी केले तर गणेश मस्के, संदीपान बडगे, साहेबराव पोपळे, मधुकर शिंदे महाराज, मुकेश रसाळ, किशोर गिराम, प्रदीप माने, संतोष जाधव, सुनिल सुरवसे, महादेव रकटे, प्रकाश खांडे सर, पप्पूजी बरीदे या सर्वांनी मिळून अनिलदादांना विजयाचे समीकरण जुळवून आणण्यासाठी शहर-गावखेड्यात कोणत्या योजना/यंत्रणा राबविणे अत्यावश्यक आहे यांसदर्भात मार्गदर्शन सूचना केल्या तसेच अनिलदादा केवळ तुम्हीच आपल्या बीडवासियांना क्षीरसागरांच्या तावडीतून वाचवू शकता, आम्ही जीवाचं रान करू पण यंदा विजयाचा गुलाल तुमच्या कपाळी लावू आणि बीड क्षीरसागर मुक्त करण्यासाठी लढा देऊ असा ठाम निश्चय या बैठकीत सर्व जाती-धर्मातील बीड विधानसभा अपक्ष उमेदवार अनिलदादा जगताप यांच्या समर्थकांनी केला. याप्रसंगी मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती-धर्मातील माणसं उपस्थित होते.

### अल्पसंख्याकांच्या विकासासाठी

हाजी असीम बागवान, जकिरिया साहेब, इलियास मेंबर, युवा नेते इरफान बागवान, बिलाल भाई, सद्दाम भाई, जावेद खान, माजेद कुरेशी, साजेद जहागीरदार, नवगण शिक्षण संस्थेचे संचालक आमेर शेख यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आ.इद्रिस नायकवडी म्हणाले की, अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात अल्पसंख्याक समाजासाठी काम करता येत आहे. ते समाजासाठी शिक्षण, संरक्षण व आरक्षण हे महत्वाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्नशील असतात. सामान्य लोकांच्या हक्क व अधिकारांसाठी अजितदादा हे महायुतीत सहभागी झाले. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जरी महायुतीत सहभागी झाला असला तरी आपली विचारधारा सोडलेली नाही. भविष्यात सोडणारही नाही. मात्र राष्ट्रवादी पक्ष महायुतीसोबत गेल्यामुळे अल्पसंख्याक समाजाची दिशाभूल केली जात आहे. समाजाच्या मनात गैरसमज निर्माण केले जात आहे. अजितदादांनी मागच्या अर्थसंकल्पात मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळाचे ३० कोटीवरून ७०० कोटी वर नेले. प्रत्येक मदरसा लसाठी वर्षाला १० लाख रुपये देण्याचा निर्णय घेतला. मुस्लिम समाज कुठल्याही गोष्टीवर सहज विश्वास ठेवतो. त्यामुळे लोकसभेत ज्या चुकीच्या अफवा पसरवल्या गेल्या, त्यामुळे चुकीच्या लोकांना मतदान केले. मात्र यावेळी विधानसभेला ही चूक करू नका. लोकसभेला काय घडले कसे घडले याचा विचार न करता विधानसभा निवडणुकीत मात्र अजितदादा, धनुभाऊ आणि डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे असे आवाहन आ.इद्रिस नायकवडी यांनी केले.

अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी कायम प्रयत्नशील : डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले, अजितदादा यांनी वादा केल्याप्रमाणे विधानसभेत १० टक्के अल्पसंख्याक समाजाचे उमेदवार दिले. विधान परिषदेत २ पैकी १ आमदार इद्रिस नायकवडी यांच्या रूपाने अल्पसंख्याक समाजाचे नेतृत्व विधानपरिषदेत पाठवले. अल्पसंख्याक समाजासाठी मार्टी रिसर्च सेंटर मंजूर करून निधी उपलब्ध करून दिला. क्षीरसागर परिवार हा मागील ५० वर्षांपासून लोकांची सेवा करत आहे. बीडमध्ये तकिया मस्जिदशेजारील जागा ही कब्रस्थानसाठी दिली. बालेपीर येथील इदगाह, पेठ बीड भागातील जुना इदगाह यासाठी कंपाऊंड वॉलसाठी निधी उपलब्ध केला. अल्पसंख्याक समाजासाठी बीडमध्ये ५ तर ग्रामीण भागात २ कोटी रुपये मंजूर करून आणले. नवगण, विनायक संस्थेत अल्पसंख्याक समाजाचे १० टक्के कर्मचारी आहेत. आपण सर्व जातीधर्माला सोबत घेऊन विकासकामे करत राहू, असा विश्वास देत २० तारखेला मोठ्या संख्येने मतदान करून निवडून देण्याचे आवाहन डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केले.

# स्व.पंडित अण्णांच्या काळात बाजार समितीने घेतलेल्या १०० एकर जमिनीवर परळीतील व्यापारी बांधवांचा हक्क - धनंजय मुंडे

## परळीत धनंजय मुंडेंच्या उपस्थितीत व्यापारी स्नेह मिलन संपन्न; व्यापार आणि उद्योग क्षेत्रात सर्वांच्या सहकार्याने भरारी घेऊ - मुंडेंचा शब्द

**परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी**

स्वर्गीय पंडित अण्णा मुंडे हे परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती असताना त्यांनी बाजार समितीच्या नावे विकत घेतलेल्या १०० एकर जमिनीवर परळीतील व्यापारी बांधवांचा हक्क आहे, व्यापारपेठेची वृद्धी करताना ही जमीन अत्यंत अल्प दरात व्यापारी बांधवांसाठी उपलब्ध करून देणार असल्याचे मत कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळीत बोलताना व्यक्त केले आहे.



मंगळवारी सायंकाळी धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळी तालुक्यातील व्यापारी बांधवांचा दीपावली निमित्त स्नेह मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्या कार्यक्रमात धनंजय मुंडे बोलत होते.

काहीजण जाणीवपूर्वक परळीत दहशत दादागिरी म्हणून, व्यापाऱ्यांना अडचण म्हणून नेहमीच परळीची बदनामी करत आहेत. मात्र खरोखर परळीत व्यवसाय करणाऱ्या लहानात लहान व्यापाऱ्यापासून ते मोठ्या व्यवसायिकांपर्यंत कुणालाही कधीही जाऊन भेटा आणि विचारा मी किंवा माझ्या सहकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारचा त्रास त्यांना आहे का? मी परळीत मोठ मोठे महोत्सव घेतले माझ्या नाद प्रतिष्ठानच्या माध्यमातून त्याचा खर्च केला परंतु परळीतील एकाही व्यावसायिक बांधवांकडून कधी एक रुपया सुद्धा वर्गणी मागितलेली नाही असेही यावेळी धनंजय मुंडे यांनी बोलताना स्पष्ट केले.

सिरसाळा येथे २२०० एकर जागेमध्ये एमआयडीसी उभारण्यास मंजुरी मिळाली आहे त्यापैकी ७८ हेक्टर जमीन अधिग्रहण करण्यात आली असून या भागात उद्योग उभारणीसाठी पोषक पूरक सुविधा उपलब्ध केल्या जातील. तसेच इथे येणाऱ्या उद्योजकांना अत्यंत स्वस्त दरात ही जमीन उपलब्ध करून द्यावी लागेल तेव्हाच मोठे उद्योग या ठिकाणी ◀◀ पान ३ वर

### ...तर माझ्या जागेत मेडिकल कॉलेज व दवाखाना उभारून देतो

माझ्या घराजवळ १६ एकर जागा शिल्लक आहे त्यापैकी १५ एकर जागा देतो कोणीही वैद्यकीय क्षेत्रातील मोठ्या व्यक्तीने पुढे यावे त्यांना ट्रस्ट तयार करून त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज व सर्व अध्ययवत वैद्यकीय सुविधा असलेले रुणालय सुरू करून देतो. त्यासाठी लागणारे अर्थसहाय्यही कर्ज स्वरूपात उपलब्ध करून देतो. मला त्यातून एक रुपयाच्या कमाईची अपेक्षा नाही अट फक्त एकच आहे की त्या रुणालयात परळी मतदारसंघातील गोरगरिबांची मोफत उपचारांची सुविधा झाली पाहिजे तसेच मेडिकल कॉलेजमध्ये मतदारसंघातील पात्र विद्यार्थ्यांना अत्यंत अल्प दरात प्रवेश मिळाला पाहिजे, असेही धनंजय मुंडे यांनी सांगितले.

# आ.पवार काकांच्या प्रचारासाठी पुतण्या शिवराजने पिंजून काढले तांडे-वस्त्या

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई विधानसभा मतदारसंघातील अपक्ष उमेदवार आमदार लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी पुतणे शिवराज पवार यांनी पाचेगाव गटातील तांडे - वस्त्या मंगळवारी पिंजून काढले. तांडे - वस्त्या च्या विकासाची गंगा सुरू ठेवण्यासाठी आमदार लक्ष्मण पवार यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे रहा असे आवाहन युवा नेते शिवराज पवार यांनी यावेळी केले.



गेवराई विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार आमदार लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी युवा नेते शिवराज पवार यांनी मंगळवार दि. ५ रोजी पाचेगाव गटातील आहेर वाहेगाव, पाचेगाव, पवारवाडी, रेखा नाईक तांडा, जयराम तांडा, दामुनाईक तांडा, चाकू नाईक तांडा, वसंत नगर तांडा आदींसह पाचेगाव ◀◀ पान ३ वर

# अल्पसंख्याकांच्या विकासासाठी धडपड करणाऱ्या डॉ. योगेश क्षीरसागर यांना साथ द्या

## अल्पसंख्यांक मेळाव्यात आ. इद्रीस नाईकवाडी यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे अल्पसंख्याक समाजासाठी मदतीला धाऊन येणारे नेते आहेत. त्यांनी समाजाच्या योजना अंमलात आणल्या. राष्ट्रवादी पक्ष महायुतीसोबत गेल्यामुळे अल्पसंख्याक समाजाची विरोधकांकडून दिशाभूल केली जात आहे. अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी धडपड करणारे युवा नेतृत्व डॉ.योगेश



क्षीरसागर यांना एकदा संधी देऊन विधानसभेत पाठवा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष तथा आमदार इद्रिसजी नाईकवडी यांनी केले आहे.

### माजी नगरसेवक जुनेद जहागीरदार यांचा प्रवेश

बीड नगरपरिषदेचे माजी नगरसेवक जुनेद जहागीरदार यांच्यासह साजेद जहागीरदार, आमेर जहागीरदार, समीर शेख, इम्रान शेख यांच्यास कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत केले.

बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर यांच्या प्रचारार्थ शहरात बुधवारी आयोजित केलेल्या अल्पसंख्याक मेळाव्यात ते बोलत होते.

व्यासपीठावर बीडचे महायुतीचे उमेदवार डॉ.योगेश क्षीरसागर, राष्ट्रीय सरचिटणीस साजिद बेग काझी, राष्ट्रीय उपाध्यक्ष शेख शफीक, अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष इकबाल शेख, जिल्हा कार्याध्यक्ष रमिज खान, ज्येष्ठ माजी नगरसेवक सादेक उज्जमा, नसीर अन्सारी, जुनेद जहागीरदार, बागवान समाजाचे अध्यक्ष हशम बागवान, ◀◀ पान ३ वर

# लबाड क्षीरसागरांपासून बीडकरांची सुटका करण्यासाठी अनिलदादा समर्थकांची वज्रमठ

बीड । प्रतिनिधी

गेल्या चाळीस वर्षांपासून बीड विकासाचा खेळखंडोबा करणाऱ्या लबाड क्षीरसागरांना धडा शिकवायचा असेल तर आता अठरा पगड जाती-धर्मातील माणसांची एकजूट होणे गरजेचे आहे. आलटून-पालटून क्षीरसागरांचे नवनवीन चेहरे समोर येतात,



विकास पुरुष म्हणून स्वतःची ब्रँडिंग करतात आणि सामान्य जनतेला लुटत राहतात. सत्ता स्वतःच्या घरात टिकवून ठेवण्यासाठी क्षीरसागर आपापसात भांडण्याचे नाटक करून बीडकरांची दिशाभूल करतात. मात्र लक्षात ठेवा हे सगळे क्षीरसागर एकच आहेत. आजवर जे झालं ते झालं पण आता ही वेळ क्रांतीची आणि परिवर्तनाची आहे. बीडवासियांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी, बीड विकसाचा कायापालट करण्यासाठी एकजुटीने कामाला लागा. असे आवाहन बीड विधानसभा अपक्ष उमेदवार मा. अनिलदादा जगताप यांनी आपल्या समर्थक आणि कार्यकर्त्यांना केले.

### ही वेळ क्रांतीची, बीडवासियांचे मूलभूत प्रश्न सोडविण्यासाठी एकजुटीने कामाला लागा- अनिलदादा जगताप

काल दि. ५ नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास मराठा संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील समर्थक, मराठा सेवक तसेच सर्व जाती-धर्मातील अनिलदादांच्या समर्थकांनी मिळून ◀◀ पान ३ वर

# आ. पंकजाताई मुंडेंच्या भव्य प्रचार रॅलीने पर्वती मतदारसंघातील वातावरण ढवळले

**पुणे । प्रतिनिधी**

पर्वती मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार माधुरीताई मिसाळ यांच्या प्रचारार्थ भाजपच्या राष्ट्रीय सचिव आ. पंकजाताई मुंडे यांच्या बुधवारी संध्याकाळी निघालेल्या भव्य प्रचार रॅलीने वातावरण अक्षरशः ढवळून निघाले. माधुरीताई ह्या सर्व सामान्य जनतेच्या उमेदवार आहेत, त्यांनी मतदारसंघांत केलेल्या विकास कामांमुळे त्या सलग चौथ्यांदा विक्रमी मताधिक्य घेऊन विजयी



होतील असा विश्वास आ. पंकजाताई मुंडे यांनी यावेळी बोलतांना व्यक्त केला.

भाजपा महायुतीच्या उमेदवार माधुरीताई मिसाळ यांच्या प्रचारार्थ पर्वती मतदारसंघांतील जनता वसाहतीत काल आ. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. या रॅलीत मतदार बांधव मोठया संख्येने सहभागी झाले होते. सुमारे तीन तास चाललेल्या या रॅलीत मतदारांचा मोठा उत्साह आणि जल्लोष पहायला मिळाला. वाजतगाजत, फटाक्यांच्या आतिषबाजीत व जेसीबीतून फुलांची उधळण करत भल्या मोठ्या पुष्पहाराने आ. पंकजाताईंचे जागोजागी स्वागत झाले. महिलांनी देखील औक्षण ◀◀ पान ३ वर

# आष्टी विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार महेबुब शेख यांना विजयी करा

## संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते



आष्टी । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब, शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वरजी सातपुते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज आष्टी येथे आष्टी विधानसभा महाविकास आघाडीचे उमेदवार मेहबूब भाई शेख यांच्या प्रचारार्थ आष्टी विधानसभा मतदारसंघातील शिवसेना पदाधिकाऱ्यांची ◀◀ पान ३ वर

# दलित, वंचित आणि शोषित या समाज घटकांसाठी प्रामाणिकपणे काम करणारा नेता अशी सुरेश धस यांची ओळख आहे -पप्पू कागदे

आष्टी । प्रतिनिधी

समाजातील सर्वसामान्य असलेले दलित, शोषित,आणि वंचित या समाज घटकांसाठी प्रामाणिकपणे काम करणारा नेता अशी सुरेश धस यांची ओळख असून गेली तीस वर्ष त्यांनी सातत्याने हे काम केले आहे असे प्रतिपादन रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट या पक्षाचे युवक आघाडीचे महाराष्ट्र राज्याचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले.

आष्टी येथील भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या महायुतीच्या कार्यकर्ता संवाद बैठकीमध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते




मतदारसंघातील भीमसैनिक सुरेश धस यांच्या पाठीशी

यावेळी व्यासपीठावर विधानसभा निवडणुकीतील भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि रिपाई या महायुतीचे उमेदवार सुरेश धस, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष माजी सभापती अरुण भैय्या निकाळजे, शिरूर नगरपंचायत चे सभापती अरुण भालेराव, डॉ.नरेंद्र जावळे, सादिक ◀◀ पान ३ वर

# आडसकर साहेबांना मतदान रुपी आशीर्वाद द्या -ऋषिकेश आडसकर

किल्ले धारूर । प्रतिनिधी

माजलगाव मतदार संघातील अपक्ष उमेदवार रमेश आडसकर यांच्या प्रचारार्थ ऋषिकेश आडसकर यांनी व्यापाऱ्यांशी प्रत्यक्ष भेट घेट संवाद साधत रमेश आडसकर यांना मतदान रुपी आशीर्वाद देण्याचे आव्हान केले.



माजगाव विधानसभा मतदारसंघातील युवा नेते ऋषिकेश आडसकर यांनी धारूर शहरातील व्यापारी, प्रतिष्ठित नागरिक ,डॉक्टर ,वकील यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधून येणाऱ्या २० तारखेला मतदान रुपी आशीर्वाद देऊन मोठे मताधिक्य द्यावे अशी विनंती केली. धारूर शहरात रमेश आडसकर यांना मानणार मोठा वर्ग आहे त्यातच शरद पवारांकडून उमेदवारी डावल्याने त्यांच्याबद्दल एक सहानुभूती व आपलेपणाची भावना शारतील नागरिकांमध्ये आहे आडसकर साहेबांच्या माध्यमातून शरातील पायाभूत सुविधांची निर्मिती केली जाईल धारूर शहरास विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रमेश आडसकर यांना मतदान रुपी आशीर्वाद देण्याचे आव्हान केले या वेळी धारूर शहरात मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे दिसले.

# राष्ट्रवादी काँग्रेसचा माजलगाव मतदारसंघाला विकासाचा वादा - आ. सोळंके

## २१ कलमी विकासाचा कार्यक्रम आ. सोळंके यांचेकडुन जाहिर; माजलगावात पत्रकार परिषद

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव विधानसभा मतदारसंघात आगामी काळात होणा-या २१ कलमी विकासाचा वादा आ. प्रकाशदादांनी जाहिर करत राष्ट्रादी काँग्रेसचा माजलगाव मतदारसंघाला विकासाचा वादा असल्याचे आ. प्रकाश सोळंके यांनी सांगीतले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर त्यांच्या निवासस्थांनी आयोजित पत्रकार परिषदेत आज दि. ६ नोव्हेंबर २०२४ रोजी ते बोलत होते. पुढे बोलतांना आ. सोळंके म्हणाले की, पुढील पाच वर्षात माजलगावला प्रगतीच्या नव्या शिखरावर पोहचविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेकेडकर या महापुरूषांचे स्मारकासाठी जागा उपलब्ध करून दिली, ग्रामीण भागातील स्वच्छ पाणी पुरवठा प्रतिव्यक्ती




५५ लिटर करून प्रत्येक गाव, वस्ती, तांडा बारमाही रस्त्याने जोडण्याचा वादा, शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग उभारून शेतक-यांना हमखास उत्पन्न मिळवुन देण्याचा तसेच शेतीपोच रस्त्यासाठी पाणंद रस्ते योजना प्रत्येक गावात राबविण्याचा वादा, माजलगाव येथे विकास प्रतिष्ठाणचे रत्नसुंदर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल सहा महिण्यात सुरू करण्याचा वादा, पोखरा योजनेत नव्याने समाविष्ट झालेल्या गावांमध्ये सर्व योजनांची प्रभावी अंमलबाजवणी करण्याचा वादा यासह मतदार संघात विवीध विकासकामांचा वादा आ. सोळंके यांनी यावेळी केला तर शहरात असलेल्या अनेक प्रलंबीत प्रश्नाबाबत पत्रकारांनी विचारले असता पुढील चार महिण्यांत बाजाराच्या जागेचा प्रश्न सोडविणार असल्याचे सांगीतले. धारूरच्या अरूंद रस्ता घाटाचा, माजलगाव शहरातील मुख्य रस्त्यावरील नाल्यावरील नाल्यांचा प्रश्न लवकर सोडविण्यात येईल तर अपक्ष उमेदवारांकडुन महायुतीचे नेते आ. पंकजा मुंडे व ना. धनंजय मुंडे यांच्या फोटोंचा वापर करून जनतेची दिशाभुल केली जात आहे. याच्याविरोधात पक्षश्रेंष्ठींकडे तक्रार केली असुन त्यावर कारवाई होईल असेही ते म्हणाले. पत्रकार परिषदेला शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले, माजलगाव विकास प्रतिष्ठाणच्या अध्यक्षा मंगलाताई प्रकाश सोळंके, मा. सभापती जयसिंग सोळंके,

◀◀ पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

गुरूवार, दि.७ नोव्हेंबर २०२४ । पान ५

# राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून ५० मतदारसंघासाठी ५० जाहीरनामे; बारामतीच्या बालेकिल्ल्याठी दादांकडून बड्या घोषणा...

पुणे । प्रतिनिधी

विधानसभेच्या अनुषंगाने सर्व पक्षांनी जय्यत तयारी केली आहे. पक्षांचे जाहीरनामे प्रसिध्द होत आहेत, आज राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवारांच्या पक्षाने आपला जाहीरनामा प्रसिध्द केला. पक्षाचे अध्यक्ष अजित पवारांनी बारामतीत पत्रकार परिषद घेतली. त्यांच्या पक्षाचा जाहीरनामा सादर केला. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार निवडणूक लढवत असलेल्या ५० मतदारसंघांसाठी वेगळा जाहीरनामा सादर करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. तर बारामतीकरांसाठीचा जाहीरनाम्यात अनेक गोष्टींवर भर देण्यात येत आहे.

बारामतीकरांसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेसने दिलेली आश्वासने काय?

बारामती शहराला कुस्तीची परंपरा आहे. त्यामुळे बारामतीत महाराष्ट्रातील पहिली जागतिक दर्जाची क्रीडा आकादमी उभी करण्याची घोषणा अजित पवारांनी केली आहे. या अकादमीमध्ये बॉक्सिग, कुस्ती, भालाफेक, शुटींग, पोहणे इत्यादी प्रकारचे खेळ शिकवून खेळाडू तयार केले जातील. त्याचबरोबर आधुनिक सुविधा, वैधानिक कोचिंग आणि प्रशिक्षण महाराष्ट्रातील खेळाडूंना दिले जाईल.



शेतकऱ्यांसाठी पाच हजार कृषी अधारित फूड प्रोसेसिंग युनिटचे एक नेटवर्क तयार केले आहे. यासोबतच बारामतीमध्ये लवकरच एक लॉजेस्टिक पार्क उभारण्यात येईल, यामुळे स्थानिकांना आजूबाजूच्या नागरिकांना रोजगार उपलब्ध होईल. बारामतीत जागतिक क्रीडा अकादमी सुरू करण्यात येईल. पंजाब आणि हरियाणातून प्रेरणा घेऊन अकादमी सुरू केली जाणार आहे. बॉक्सिंग आणि भालाफेक शिकवलं जाईल. बारामतीला पहिलं सौर ऊर्जा असलेलं शहर बनवलं जाणार आहे. बारामतीत कॅन्सरसाठी कर्करोग रुग्णालय उभारण्यात येणार आहे. कर्करोगासाठी पुणे आणि मुंबईला जाण्याची गरज पडणार नाही, असंही यावेळी त्यांनी म्हटलं आहे.

शेतकरी सन्मान योजना आम्ही १५ हजार रुपये करणार

शेतकरी सन्मान योजना आम्ही १५ हजार रुपये करणार आहोत. कर्जमाफी आणि अतिरिक्त अनुदान आम्ही देणार आहोत. २० टक्के अधिक अनुदान असेल. राज्यातील ग्रामीण भागात ४५ हजार पानंद रस्ते करणार आहोत, असं राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून जाहीरनाम्यात सांगण्यात आलं आहे.

जाहीरनाम्यात आणखी काय आहे?

लाडकी बहिण योजने संदर्भात बहिणींना दीड हजर नाही तर तबल २१०० रुपये देण्यात येणार आहे.

सोबत महिला सुरक्षेसाठी २५ हजार महिलांना पोलिस दलात समावेश करण्याचा वादा करण्यात आला आहे

धान उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी २५ हजार रुपये देण्याचा वादा करण्यात आला आहे.

ग्रामीण भागात ४५००० पाणंद रस्त्यांच्या निर्मितीचा वादा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून करण्यात आलेला आहे.

शेतकऱ्यांचे कर्ज माफ करण्याचा आणि शेती पिकांच्या एम.एस.पी वरती २०% अनुदान देण्याचा वादा अजित दादांच्या पक्षाकडून करण्यात आलेला आहे. वीज बिलात ३०% कपात करून सौर व अक्षय ऊर्जेला प्राधान्य देण्याचा वादा करण्यात आला आहे. वृद्ध पेन्शन धारकांना आता पंधराशे वरुण महिन्याला २१०० रुपये देण्याचा वादा करण्यात आला आहे. दहा लाख विद्यार्थ्यांना प्रशिक्षणातून महिन्याला दहा हजार रुपये विद्यावेतनाचा वादा करण्यात आलेला आहे.

२५ लाख रोजगार निर्मितीचा वादा देखील केला आहे.

# पिंपरीतील रुग्णालयात बॉम्ब असल्याचा मेल

## परीसरात गोंधळाचं वातावरण, पोलिस, डॉग स्कॉड घटनास्थळी दाखल



पुणे: पिंपरी चिंचवडमधील डॉ.डी. वाय पाटील रुग्णालयात बॉम्ब आहे, पुढची कारवाई तातडीनं करा. सकाळी साडे अकरा वाजता हा धमकीचा मेल रुग्णालयाच्या अधिष्ठात्यांना आल्यानं एकच गोंधळ उडाला. त्यानंतर तातडीनं रुग्णालय निर्मनुष्य करण्यात आलं अन बॉम्ब शोध-नाशक पथकाला पाचारण करण्यात आलं. कॅन्टीनमध्ये एका बॅगमध्ये बॉम्ब ठेवल्याचा अंदाज बांधून, पथकाने इथून शोधकार्य सुरू केलं. टप्याटप्याने रुग्णालयाचा कानाकोपरा ही तपासण्यात आला, मात्र कुठं ही बॉम्ब आढळला नाही. त्यामुळं हा फेक मेल असल्याचं स्पष्ट झालं अन सर्वांचाच जीव भांड्यात पडला.

या घटनेबाबत मिळालेल्या माहितीनुसार, हॉस्पिटलच्या डीन यांना एक मेल आला होता. त्यामध्ये ठिकाण सांगण्यात आलेलं नव्हतं, एक बॅग ठेवल्याचं सांगण्यात आलं होतं आणि तसं मेलमध्ये लिहिण्यात आलं होतं. पुढील कारवाई करा अशी माहिती देण्यात आली होती. या मेलची माहिती समजतात पोलिसांना बॉम्ब स्कॉडला ताबडतोब याबाबतची माहिती देण्यात आली. पोलिसांची पथके देखील ताबडतोब घटनास्थळी दाखल झाली डॉग स्कॉड घटनास्थळी दाखल झालं.

तपासणी चालू आहे

सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास हा मेला आला होता त्यानंतर लगेच ही कारवाई सुरू करण्यात आली. सर्व ठिकाण तपासण्यात आली हॉस्पिटलमध्ये गर्दीचे ठिकाण असलेली सर्व तपासण्यात येत आहेत. कॅन्टीन पार्किंग ज्या ठिकाणी गर्दी होते ती ठिकाण तपासण्यात येत आहेत. बाकीचे काही ठिकाणी तपासली गेली मेलाला तसं काही सापडलेलं नाही तरी देखील अद्याप पोलीस तपास करत आहेत.

# पुण्यातील 'या' हायप्रोफाइल केसमध्ये सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय, जामीन फेटाळल्यामुळे आरोपीची अटक निश्चित

पुणे : कल्याणीनगरमधील हायप्रोफाईल अपघातप्रकरणात कारमधील अल्पवयीन मुलांचे रक्त बदल्याप्रकरणी दाखल केलेल्या गुन्ह्यात उच्च न्यायालयाने अटकपूर्व जामीन फेटाळल्यानंतर सर्वोच्च न्यायालयानेही या आरोपीचा अटकपूर्व जामीन फेटाळला आहे. आरोपीच्या सांगण्यावर एकाने स्वतःच्या रक्ताचे नमुने दिले होते. जामीन फेटाळला गेल्यामुळे आरोपीची अटक आता निश्चित झाली आहे. अरुणकुमार देवनाथ सिंग असे जामीन फेटाळलेल्या आरोपीचे नाव आहे.

गुन्हा दाखल झाल्यानंतर सिंग याने येथील जिल्हा न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला होता. न्यायालयाने तो फेटाळला होता. नंतर त्याने उच्च न्यायालयात धाव घेत अपील केले होते. सुरुवातीला त्याला अंतरिम जामीन मंजूर केला होता. मात्र आता न्यायालयाने त्याचा जामीन (दि. २३ ऑक्टोबर) फेटाळला होता. त्यानंतर सिंग याने उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने देखील दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकल्यानंतर सिंग याला कोणत्याही प्रकारचा दिलासा न देता रक्त बदलण्याच्या प्रक्रीयेत सक्रीय



सहभाग दिसत असल्याने जामीन फेटाळून लावला, अशी माहिती वरिष्ठ पोलीस अधिकार्यांनी दिली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, अपर आयुक्त शैलेश बलकवडे यांच्या मार्गदर्शनात सहायक आयुक्त गणेश इंगळे या गुन्ह्याचा तपास करत आहेत. पहिले दोषारोपपत्र न्यायालयात दाखल झालेले आहे. अद्याप याप्रकरणातील अल्पवयीन चालक मुलाच्या कुटूंबियांना जामीन मिळालेला नाही.

सिंगच्या सांगण्यावरून मित्तलने रक्त दिले

अल्पवयीन कारचालक मुलाच्या दोन अल्पवयीन मित्र देखील अपघातावेळी गाडीत होते. त्यांना वाचविण्यासाठी गुन्ह्यात यापूर्वी अटक केलेले आरोपींनी ससूनच्या आपत्कालीन विभागाचा तत्कालीन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. श्रीहरी हाळनोर व न्यायवैद्यक विभागाचे प्रमुख डॉ. अजय तावरे यांना लाच दिली. त्यानंतर आरोपीने एका मुलाच्या रक्ताच्या नमुन्यांच्या जागी स्वतःच्या रक्ताचा नमुना दिला, तर आशिष नावाच्या आरोपीने अरुणकुमार सिंग याच्या सांगण्यावरून दुसर्या मुलाच्या जागी स्वतःचे रक्त दिल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले आहे.

पोर्शे अपघात प्रकरण

पुण्यात पोर्शे कारने दोघांच्या मृत्यूसाठी जबाबदार असलेला अल्पवयीन आरोपीला घटनेच्या १५ तासात जामीन मिळाल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त केला जात होता. आता या प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. अल्पवयीन आरोपी बेदरकारपणे पोर्शे कार चालवित होता. यात त्याने बाईकला धडक दिल्याने अनिस दुधिया आणि अश्विनी कोस्टा या दोघांचा जागेवरच मृत्यू झाला. आरोपी अल्पवयीन असल्याने काही तासात जामीन मिळाला. यानंतर देशभरातून रोष व्यक्त केला जात होता. पुणे पोलिसाच्या कारवाईवरही ठपका ठेवण्यात आला होता.

# राज ठाकरे काय बोलतील ते सांगता येत नाही, त्याकडं तुम्ही लक्ष देऊं नका, अजित पवारांचा कार्यकर्त्यांना सल्ला

पुणे । प्रतिनिधी

काहीजण म्हणतात अमुक चोरले तमूक चोरले. पण आमदार, जिल्हाध्यक्ष महत्त्वाचे असतात. राज ठाकरे काय बोलतील सांगता येत नाही. कधी असं कधी तसं बोलतात. त्याकडं तुम्ही लक्ष देऊं नका असे वक्तव्य राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केलं. आम्ही कामाची माणसे, दलबदलु करणारे नाही असेही अजित पवार म्हणाले.

आप्पासाहेब अनेक जण घेऊन आलेत, तिकडे काही ठेवता का नाही?

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे नेचे आप्पासाहेब जगदाळे यांनी आज अजित पवार गटात प्रवेश केला. यावेळी ते बोलत होते. आताचा पक्ष प्रवेश बघून जयंत पाटील यांना वाटलं असेल आप्पासाहेब जगदाळे यांना उमेदवारी दिली असती तर बरं झालं असतं असेही अजित पवार म्हणाले. आप्पासाहेब अनेक जण घेऊन आले आहेत. अजून घेऊन येणार असे सांगत आहेत तिकडे काही ठेवता की नाही? का सगळंच घेऊन येता? असा सवालही अजित पवार यांनी केला.



सत्तेचा वापर हा सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी करायचा असतो

मिळालेल्या सत्तेचा वापर हा सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी करायचा असतो ही शिकवण आम्हाला मिळाली असल्याचे अजित पवार म्हणाले. चांगल काम करणे हे आपलं कर्तव्य असल्याचे अजित पवार म्हणाले. आम्हीपण चांगली चांगली माणस पाहत असतो. पक्ष वाढीसाठी चांगल्या माणसांची गरज असते असेही अजित पवार म्हणाले. कोणतंही काम तीडस नेण्याचं काम आप्पासाहेब जगदाळे यांनी केल्याचे अजित पवार म्हणाले. ते शिक्षण संस्था चांगल्या चालवतात असेही अजित पवार म्हणाले. आप्पासाहेब जगदाळे यांच्या येण्यानं आपली ताकद वाढली असल्याचे अजित पवार यावेळी म्हणाले, समोरचे उमेदवार तुल्यबळ आहेत, असं समजून आपले आखाडे बांधायचे असतात असेही अजित पवार यावेळी म्हणाले.आम्ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला आहे. यामध्ये सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केल्याची माहिती अजित पवार यांनी दिली. मी कधीही जातीभेद करत नाही. मी बोलतो तसं वागतो असेही अजित पवार म्हणाले. पुढे जायचं असेल तर सर्वांना सोबत घेऊन जावं लागेल असेही अजित पवार यावेळी म्हणाले. आपण शिव शाहू फुले आंबेडकरांचा आदर्श घेतो, त्यावेळी जनता देखील विचार करत असते की बे लोक बोलतो तसे वागतात का असे ते म्हणाले.



# पिंपळे सौदागर प्रजापिता ब्रम्हकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय येथे दिवाळी निमित्त कार्यक्रम संपन्न

**या कार्यक्रमावेळी उन्नती फाऊंडेशनचे संस्थापक संजय भिसे यांची मुख्य उपस्थिती होती. रहाटणी सेवा केंद्राच्या वर्षा दीदी यांनी दिवाळीचे अध्यात्मिक रहस्य सांगितले. तसेच शिक्षिका योगिता दीदी आणि विभा दीदी यावेळी उपस्थित होत्या.**

# मंचर शहराच्या आणखी विकासासाठी; पूर्वा वळसे पाटील यांचे मंचरच्या जनतेला आवाहन

मंचर । प्रतिनिधी

राज्यात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. दरम्यान महाविकास आघाडीच्या आणि महायुतीच्या राज्यभर प्रचारसभा देखील सुरू झाल्या आहेत. तसेच प्रत्येक उमेदवार हा मोठ्या जोमाने प्रचार करत आहे. आंबेगाव तालुक्यातील मंचर ही मध्यवर्ती ठिकाणी असलेली बाजारपेठ आहे. मंचर शहरासाठी दिलीप वळसे पाटील यांचे योगदान मोठे आहे . शहराच्या विकासासाठी वळसे पाटील यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर केला आहे . मंचर शहराच्या आणखी विकासासाठी पुन्हा एकदा वळसे पाटील यांना साथ द्या असे आवाहन राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्राच्या संचालिका पूर्वा वळसे पाटील यांनी केले .



आंबेगाव शिरूर विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार दिलीप वळसे पाटील यांच्या प्रचारार्थ मंचर शहर व परिसरात राष्ट्रीय ग्रामीण विकास केंद्राच्या संचालिका पूर्वा वळसे पाटील यांनी मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या . यावेळी त्या बोलत होत्या .

भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष बाळासाहेब बेंडे, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भागूजी पिंगळे, शरद बँकेचे संचालक दत्ताशेठ थोरात, मंचर शहर अध्यक्ष सुहास बाणखेले, शरद बँकेचे संचालक अजय घुले,राजेंद्र थोरात,जगदीश घिसे, लक्ष्मण थोरात, अशोक गांजाळे, जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या अरुणा थोरात,आरती थोरात, माणिक गावडे, वेणूताई खरमाळे,वैशाली बेंडे,सोनाली काळे,जागृती महाजन, विजया खेडकर, सविता क्षीरसागर,अक्षदा शिंदे,मालती थोरात, माया देठे,शुभम बाणखेले,संकेत वायकर, खालिदभाई इनामदार, हमीर अली शेख,ज्योती निघोट,आदी पदाधिकारी,ग्रामस्थ व महिला उपस्थित होते.

पूर्वा वळसे पाटील यांनी मंचरचे ग्रामदैवत श्री .भैरवनाथ मंदिरात दर्शन घेऊन वळसे पाटील यांच्या अष्टविजयाचे साकडे घातले . घराघरांमध्ये जाऊन मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या. अडी - अडचणी समजावून घेतल्या. मंचर शहरातील विविध विकास कामांसाठी वळसे पाटील कटिबद्ध आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या अनुसया महिला उन्नती केंद्राच्या माध्यमातून महिला भगिनींचे अनेक प्रश्न मार्गी लावले जातात . केंद्र राज्य शासनाच्या अनेक योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी अनुसया महिला उन्नती केंद्राशी संपर्क महिलांनी साधावा . असे आवाहन पूर्वाताई वळसे पाटील यांनी केले . यावेळी मंचर शहरातून वळसे पाटील यांनाच मोठे मताधिक्य मिळवून देणार असल्याचे पक्षाच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान महायुतीचे उमेदवार आणि माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी देवदत्त निकम यांच्यावर टीका केली आहे. आमदारकी डोळ्यासमोर ठेवूनच ते माझ्यासोबत फिरत होते अशी टीका त्यांनी केली आहे.आपण मंचर कृषी उत्पन्न बाजार समितीत देवदत्त निकम यांना सभापतीपद देऊन चुक केली . त्यांन तेथे मनमानी कारभार केला . व्यापाऱ्यांचा रोष ओढून घेतला . धना मेथीचा बाजार बंद पाडला. केवळ आमदारकी डोळ्यासमोर ठेवूनच ते माझ्यासोबत तालुका फिरले . अशी टीका सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांनी देवदत्त निकम यांच्यावर केली.

# सुनिल शेळकेंसाठी कार्यकर्ते एकवटले; लोणावळा शहर भाजपाचा महायुती धर्म पाळण्याचा निर्णय

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

महायुतीकडून सुनील शेळके यांना मावळातून उमेदवारी दिल्याने भाजपचे माजी आमदार बाळा भेगडे यांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवाराला आपला जाहीर पाठिंबा दिला. त्यानंतर मावळात वेगाने राजकीय हालचाली सुरू झाल्या आहेत. बाळा भेगडे यांच्या भूमिकेनंतर अनेक कार्यकर्ते संभ्रमात होते. मात्र महायुतीच्या वरिष्ठ नेत्यांनी सुनील शेळके यांचा प्रचार करण्यास सांगितल्याने कार्यकर्ते देखील सक्रिय झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर लोणावळा मंडल कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत संपुर्ण कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी महायुतीच्या उमेदवाराच्या पाठीमागे राहण्याचा निर्णय घेतला.

सुरूवातीपासून मावळचं राजकारण महाराष्ट्रात चर्चेत राहिले आहेत. याठिकाणी सुनील शेळके विद्यमान आमदार असून त्यांना पुन्हा एकदा विधानसभेची उमेदवारी दिली आहे. मात्र त्यांच्या उमेदवारीला भाजपच्या काही नेत्यांनी विरोध दर्शविला होता. यात विशेष करून माजी आमदार



बाळा भेगडे यांनी अपक्ष उमेदवार बापू भेगडे यांच्या पाठीमागे राहण्याचा निर्णय घेतला. परंतु राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुनील शेळके यांच्या पाठीमागे संपुर्ण भाजप राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

त्याचनंतर लोणावळा मंडलचे शहर अध्यक्ष अरूण लाड, माजी नगरसेवक देवीदास कडू, जिल्हा उपाध्यक्ष दिपक कांबळे यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका स्पष्ट केली. यामध्ये बाळा भेगडे आमचे नेते आहेत. दैवत आहेत. परंतु आम्ही संघटनेचे काम करू. पक्षाचे वरिष्ठ नेते जे आदेश देतील, ते आम्हाला मान्य करावेच लागणार. ज्या पद्धतीने लोकसभेत आम्ही महायुती धर्म पाळला होता. तोच धर्म आता विधानसभेत देखील पाळू असेही त्यांनी सांगितले आहे.

दरम्यान, नव्या राजकीय समीकरणानुसार अनेक मतदारसंघात महायुतीत बंडखोरी बघायला मिळाली. ही बंडखोरी शमवण्यात महायुतीला यश प्राप्त झाले. परंतु काही ठिकाणी बंडखोर आपल्या भूमिकेवर ठाम राहिले आहेत. परंतु पक्षाने थेट त्यांच्यावर कारवाई करण्यास सूरूवात केलीय. विशेष करून भाजपने अशा अनेक बंडखोर नेत्यांवर कारवाई केली आहे.

# पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धा; करणदीप कोचर आणि क्षितिज नावेद कौल यांची संयुक्त आघाडी

**पुणे । प्रतिनिधी**

'द पूना क्लब गोल्फ कोर्स' आणि भारतातील व्यावसायिक गोल्फचे एकमेव अधिकृत नियामक मंडळ टाटा स्टिल प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीजीटीआय) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित द पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धेत चंडीगढच्या करणदीप कोचर आणि दिल्लीच्या क्षितिज नवीद कौल यांनी सात-अंडर ६४ (दोषांक) गुणांसह पहिल्या फेरीत संयुक्त आघाडी घेतली आहे.

तिसऱ्या क्रमांकावर मोठी झेप

पूना क्लब गोल्फ कोर्स येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत पहिल्या फेरीत रशीद खान आणि सार्थक छिब्बर या दिल्लीच्या जोडीने सहा-अंडर ६५ गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. दिव्यांश दुबे याने -६६ गुणांसह तो पुणेस्थित व्यावसायिकांमध्ये सर्वोच्च स्थान घेतले आहे. दिव्यांशने चंडीमंदिरच्या चंदरजीत यादव आणि बेंगळुरूच्या एम धर्मासोबत पाचवे स्थान मिळविले.





१ कोटी रुपयांचे सर्वोच्च पारितोषिक

द पूना क्लब गोल्फ कोर्स आणि भारतातील व्यावसायिक गोल्फचे एकमेव अधिकृत नियामक मंडळ टाटा स्टिल प्रोफेशनल गोल्फ टूर ऑफ इंडिया (पीजीटीआय) यांच्या संयुक्त विद्यमाने आजपासून ते ९ नोव्हेंबर दरम्यान पूना क्लब गोल्फ कोर्स येथे रंगणाऱ्या द पूना क्लब ओपन गोल्फ स्पर्धेची आज घोषणा करण्यात आली. या स्पर्धेमध्ये पुण्यातील आतापर्यंतच्या सर्वोच्च १ कोटी रुपये पारितोषिक रकमेचा समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धेत जगभरातील दिग्गज खेळाडूंचा सहभाग असणार आहे. तसेच, आंतरराष्ट्रीय सामन्यामध्ये या स्पर्धेची रँकींग ग्राह्य धरली जाणार आहे.

टाटा स्टील पीजीटीआय मानांकनातील अव्वल खेळाडू

प्रमुख नामांकित खेळाडूंमध्ये टाटा स्टील पीजीटीआय मानांकनातील अव्वल खेळाडू वीर अहलावत ६८ गुणांसह १२ व्या स्थानावर आहे तर स्थानिक आवडता खेळाडू उदयन माने हा ७२ गुणांसह ६० व्या स्थानावर आहेत. उत्तम ड्रायव्हिंग फॉर्ममध्ये असलेल्या करणदीप कोचरने बुधवारी निर्दोष ६४ गुण नोंदविले. कोचर, पार-४ नवव्या क्रमांकावर ग्रीन ड्रायव्हिंग करण्यापूर्वी आणि पंधरा फूटरमध्ये रोलिंग करण्यापूर्वी फ्रंट-नाईनवर दोन लहान बर्डी पुट बदलले. त्याने अप्रतिम कौशल्य दाखवीत तिथे बर्डीसाठी दोन-पुट लावले. त्यानंतर आशियाई मालिकांमध्ये नियमितपणे सहभागी होणाऱ्या या २५ वर्षीय खेळाडूने त्याच्या कार्डमध्ये आणखी १५-फुट रूपांतरणासह आणखी दोन बर्डी जोडले.

करणदीपची सलग सातवी स्पर्धा

करणदीप म्हणाला, महत्त्वाची गोष्ट म्हणजे, मी सुरुवातीपासूनच आक्रमक पवित्रा घेतला होता आणि माझे नेमही अचूक होते. ही माझी सलग सातवी स्पर्धा आहे